रायगड, नवी मुंबई
◆ वर्ष १७ ◆ अंक ३१०
www.ramprahar.com
# राम प्रहर
बुधवार, २८ मे २०२५ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹२

## छत्तीसगडमध्ये १८ नक्षलवाद्यांचे आत्मसमर्पण



**बस्तर** : मागील काही दिवसापासून छत्तीसगडमध्ये सुरू असलेल्या नक्षलविरोधी मोहिमेला यश मिळाल्याचे दिसत आहे. दक्षिण बस्तर विभागात सक्रिय असलेल्या चार कट्टर नक्षलवादी आणि पीएलजीए बटालियन क्रमांक १सह एकूण १८ नक्षलवाद्यांनी मंगळवारी (दि. २७) आत्मसमर्पण केले. या नक्षलवाद्यांवर एकूण ३९ लाख रुपयांचे बक्षीस जाहीर करण्यात आले होते. सुकमाचे पोलीस अधीक्षक किरण चव्हाण म्हणाले की, आत्मसमर्पण करणाऱ्यांमध्ये एक महिला आणि १८ पुरुष नक्षलवाद्यांचा समावेश आहे. नक्षलवादी संघटना सोडून समाजाच्या मुख्य प्रवाहात दाखल होण्यासाठी या सर्वांनी पोलीस, सीआरपीएफ, कोब्रा बटालियनसमोर शस्त्रांशिवाय आत्मसमर्पण केले आहे. छत्तीसगड सरकारच्या पुनर्वसन धोरणांतर्गत सर्वांना लाभ दिले जातील.

अंतरंग
मुरूडच्या मंगेश दांडेकरांची राष्ट्रवादीमध्ये घरवापसी/२
पेणमध्ये पावसाचे थैमान; गणेशमूर्तीकारांचे नुकसान/५
सूर्याचा नवा विश्वविक्रम; सचिनलाही टाकले मागे/८

# राज्य सरकारचा शेतकऱ्यांना दिलासा

### वाटपपत्राच्या दस्तास लागणारी नोंदणी फी माफ

**मुंबई : प्रतिनिधी**

राज्य सरकारने शेतकऱ्यांच्या शेतजमिनी वाटपपत्राच्या दस्ताबाबत महत्त्वाचा निर्णय मंत्रिमंडळ बैठकीत घेतला आहे. राज्यातील शेतकऱ्यांना शेतजमीन वाटपपत्राच्या दस्तासाठी लागणारी नोंदणी फी माफ करण्यात आली आहे.

राज्य मंत्रिमंडळाची बैठक मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या यांच्या अध्यक्षतेखाली मंगळवारी (दि.२७) झाली. या बैठकीला उपमुख्यमंत्री अजित पवार आणि उपमुख्यमंत्री



एकनाथ शिंदे तसेच विविध खात्याचे मंत्री या बैठकीला हजर होते. या बैठकीत एकूण १० निर्णय घेण्यात आले.

शेतकऱ्यांना शेतीची वाटणी करतेवेळी रेडीरेकनरच्या एक टक्के किंमत मोजावी लागत होती, परंतु आता नोंदणी फी माफ करण्यात आली आहे.

### मंत्रिमंडळ बैठकीत एकूण १० महत्त्वपूर्ण निर्णय

रायगड जिल्ह्यातील पेण येथील सुहित जीवन ट्रस्टच्या एकलव्य व्यवसाय प्रशिक्षण केंद्रास कार्यशाळा व पदांना मान्यता. शेट्टी आयोगाच्या शिफारशीनुसार राज्यातील न्यायिक अधिकाऱ्यांसाठी टंकलेखकाची पदे निर्माण करण्यास मान्यता. इचलकरंजी व जालना महापालिकांना वस्तू व सेवा कर भरपाई अनुदान देण्यास मान्यता. इचलकरंजीला ६५७ कोटी, जालन्याला ३९२ कोटी पाच वर्षांत मिळणार. शेतजमिनीच्या वाटणीपत्राच्या दस्तास लागणारी नोंदणी फी माफ. पत्रकार क्लब ऑफ नागपूरला देण्यात आलेल्या जमिनीबाबतच्या अटी-शर्तीमध्ये बदल करण्यास मान्यता. फॉरेस्ट डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन ऑफ महाराष्ट्र लि.मधील १ ३५१ पदांच्या सुधारीत आकृतीबंधास मंजुरी. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या उच्च प्राथमिक शाळांमध्ये अंशकालीन निदेशकांच्या नियुक्तीच्या सुधारित धोरणास मान्यता. अशियाई विकास बँक सहाय्यित महाराष्ट्र ॲग्रीबिझनेस नेटवर्क प्रकल्प संस्थेवर पणनमंत्री पदसिद्ध अध्यक्ष राहणार. कृषी पर्यवेक्षक व कृषी सहायक यांच्या पदनामात उप कृषी अधिकारी व सहाय्यक कृषी अधिकारी असा बदल. राज्य हातमाग महामंडळाच्या नागपूर येथील १९५ कर्मचाऱ्यांना सहाव्या वेतन आयोगाची थकबाकी मंजूर.

## 'देश निराशा, अंधाराच्या युगातून आत्मविश्वास, आशावादाच्या नवीन युगात'

**दाहोद (गुजरात) : वृत्तसंस्था**

गेल्या काही वर्षांमध्ये भारताने असे काही निर्णय घेतले आहेत, जे अभूतपूर्व आणि अकल्पनीय होते. दशकांच्या जुन्या बंधनांमधून मुक्त होत आज देश प्रत्येक क्षेत्रात प्रगती करत आहे. निराशेच्या आणि अंधाराच्या युगातून देश आत्मविश्वास आणि आशावादाच्या नवीन युगात उदयाला आला आहे, असे प्रतिपादन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केले.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते मंगळवारी (दि. २७) गुजरातमधील दाहोद येथे २४ हजार कोटी रुपयांपेक्षा जास्त खर्चाच्या विविध विकास प्रकल्पांची पायाभरणी, उद्घाटन आणि लोकार्पण करण्यात आले. उपस्थितांना संबोधित करताना ते म्हणाले की, २६ मे या दिवसाला विशेष महत्त्व आहे, कारण २०१४मध्ये आजच्याच दिवशी मी पहिल्यांदा पंतप्रधान म्हणून शपथ घेतली होती. तुमच्या विश्वास आणि प्रोत्साहनाने देशाची दिवसरात्र सेवा करण्याप्रति माझ्या समर्पणाला बळ दिले आहे, असेही पंतप्रधानांनी या वेळी नमूद केले.

## छत्रपती संभाजी महाराज राज्य प्रेरणागीत पुरस्काराचे वितरण; मान्यवरांची उपस्थिती

**मुंबई : प्रतिनिधी**

छत्रपती संभाजी महाराज यांच्या नावाने राज्य शासनाकडून प्रथमच राज्य प्रेरणागीत पुरस्कार घोषित झाल्यानंतर केंद्रीय गृह व सहकारमंत्री अमित शाह यांच्या हस्ते आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या प्रमुख उपस्थितीत या पुरस्काराचे वितरण 'वर्षा' या शासकीय निवासस्थानी करण्यात आले.

स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर लिखित अनादि मी.. अनंत मी... या गीताला राज्य शासनाचा छत्रपती संभाजी महाराज राज्य प्रेरणागीत पुरस्कार-२०२५ हा सन्मान देण्यात आला. या सोहळ्याकरिता उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, सांस्कृतिक कार्य आणि माहिती तंत्रज्ञानमंत्री ॲड. आशिष शेलार, पणन व राजशिष्टाचारमंत्री जयकुमार रावल, आमदार संजय उपाध्ये, सांस्कृतिक कार्य विभागाचे अतिरिक्त मुख्य सचिव विकास खारगे, सांस्कृतिक कार्य संचालनालयाचे संचालक विभीषण चवरे, स्वातंत्र्यवीर सावरकर प्रतिष्ठानचे रणजित सावरकर, अशीलता राजे, स्वप्नील सावरकर, मंजिरी मराठे, अविनाश धर्माधिकारी उपस्थित होते.

या वेळी स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्या राष्ट्रीय स्मारकासाठी दोन लाख रुपयांचा धनादेश स्वातंत्र्यवीर सावरकर प्रतिष्ठानच्या पदाधिकाऱ्यांकडे सुपूर्द करण्यात आला.



## बीडमध्ये भीषण अपघातात सहा जणांचा जागीच मृत्यू

**गेवराई** : बीडमधील गेवराई शहरानजीक असणाऱ्या गढी पुलावर एका एसयूव्ही वाहनाचा डिव्हायडरवर धडकून किरकोळ अपघात झाला. या अपघातात कोणीही जखमी झाले नव्हते, मात्र डिव्हायडरमध्ये अडकलेली गाडी बाहेर काढण्यासाठी सर्वजण बाहेर आले. याचदरम्यान त्यांना महामार्गावरून जाणाऱ्या भरधाव ट्रेलरने धडक दिली आणि यात सहा जणांचा दुर्दैवी मृत्यू झाला. हा अपघात सोमवारी मध्यरात्री झाला. दरम्यान, अपघातानंतर ट्रेलरचालक फरार झाला. पोलिसांनी त्याचा शोध सुरू केला आहे.

## एकाच कुटुंबातील सात जणांची सामूहिक आत्महत्या

**पंचकुला** : हरियाणातील पंचकुला या ठिकाणी एका कारमध्ये सात जणांचे मृतदेह आढळून आले आहेत. हे सर्वजण एकाच कुटुंबातील असून त्यांनी विष घेऊन आत्महत्या केली असल्याची माहिती पोलिसांनी दिली. सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार हे कुटुंब डेहराडून येथील आहे. कर्जाचा डोंगर वाढू लागल्याने त्यांनी सामूहिक आत्महत्या केली.

### लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या वाढदिवसानिमित्त

## पनवेलमध्ये नाट्य महोत्सवाची पर्वणी

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या ७५व्या अर्थात अमृत महोत्सवी वर्ष पदार्पणानिमित्त अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद पनवेल शाखा आणि श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ पनवेल यांच्या संयुक्त विद्यमाने पनवेलमध्ये दोन दिवसीय नाट्य महोत्सव आयोजित करण्यात आला आहे. यामध्ये 'एका लग्नाची पुढची गोष्ट' आणि 'कुटुंब किर्रतन' या सुप्रसिद्ध अशा दोन विनोदी नाटकांची पर्वणी नाट्यरसिकांना मिळणार आहे.



पनवेल शहरातील आद्य क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहात सोमवारी (दि.१ जून) सायंकाळी ४ आणि रात्री ८ वाजता सुप्रसिद्ध नाट्य व सिने अभिनेते प्रशांत दामले तसेच कविता मेडेकर, अतुल तोडणकर यांची प्रमुख भूमिका असलेले 'एका लग्नाची पुढची गोष्ट', तर मंगळवारी (दि. २ जून) सायंकाळी ४ आणि रात्री ८ वाजता सुप्रसिद्ध अभिनेते संकर्षण कऱ्हाडे, तन्वी मुंडले, अमोल कुलकर्णी आणि वंदना गुप्ते यांची भूमिका असलेले 'कुटुंब किर्रतन' या नाटकाचे सादरीकरण होणार आहे.

या नाटकांची प्रवेशिका विनामूल्य असून २८ मेपासून आद्य क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृह तिकीटघर, द आय रूम, अमोल स्टेशनरीच्या बाजूला टिळक रोड, यशोमंगल सोसायटीसमोर पनवेल, पटवर्धन आयुर्वेदिक मेडिकल, लक्ष्मी सोसायटी, गोदरेज प्लाझासमोर पनवेल या ठिकाणी उपलब्ध होणार आहे. अधिक माहितीसाठी अभिषेक पटवर्धन (८६६८३३२१५९), वैभव बुवा (९०२९४१०६९९) यांच्याशी संपर्क करावा, असे आवाहन आयोजकांकडून करण्यात आले आहे.



# वाढवण प्रकल्पातील रोजगाराच्या दृष्टीने कौशल्य विकास कार्यक्रम तयार करा -ना. राणे

**मुंबई,: प्रतिनिधी**

राज्यात वाढवण सारखा मोठा बंदर प्रकल्प तयार होत आहे. या प्रकल्पामध्ये मोठ्या प्रमाणावर रोजगार निर्माण होणार आहे. याचा सर्वात पहिला फायदा किनारपट्टीच्या जिल्ह्यांना होणार आहे. या ठिकाणी लागणाऱ्या कुशल कामगार वर्गासाठीचे प्रशिक्षण आतापासूनच सुरू करणे गरजेचे असून त्या दृष्टीने कौशल्य विकास प्रशिक्षणाचा कार्यक्रम तयार करण्याच्या सूचना मत्स्यव्यवसाय व बंदरे मंत्री नितेश राणे यांनी दिल्या.

मंत्रालयामध्ये वाढवण बंदरातील रोजगार आणि त्यासाठी प्रशिक्षण कार्यक्रमाविषयी बैठक पार पडली. त्यावेळी मंत्री राणे बोलत होते. यावेळी राष्ट्रीय कौशल्य विकास महामंडळाचे (एनएसडीसी) सल्लागार डॉ. ज्ञानेश्वर मुळे दुरदृष्य प्रणालीद्वारे उपस्थित होते.



मंत्री राणे म्हणाले की, लवकरच बंदर क्षेत्रामध्ये असलेल्या पालघर, रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग या जिल्ह्यांमध्ये शिबीरांचे आयोजन करावे. या शिबीरांमध्ये वाढवण बंदराच्या ठिकाणी असणाऱ्या रोजगाराच्या संधी, यासाठी लागणारे प्रशिक्षण यांची माहिती द्यावी. वाढवण बंदराच्या ठिकाणी निर्माण होणाऱ्या रोजगाराच्या संधींविषयी एनएसडीसीने एक प्रशिक्षण कार्यक्रम लवकरात लवकर तयार करावा. त्यासाठी सध्या राज्यात उपलब्ध असलेल्या कौशल्य विकास केंद्राच्या इमारती वापरता येतील का याचाही समावेश या प्रशिक्षण कार्यक्रमाच्या निमित्ताने करावा.

त्यामुळे जागेची अडचण दूर होऊन प्रशिक्षण कार्यक्रम लवकरात लवकर सुरू करता येईल. त्यासाठी बंदर विभागाकडून लागणारी आवश्यक मदत करण्यात येईल. वाढवण बंदरामुळे मोठ्या प्रमाणावर रोजगाराच्या संधी निर्माण होणार आहेत. त्याचा फायदा राज्यातील तरुण – तरुणींना व्हावा, यासाठी प्रशिक्षण कार्यक्रम आखावा, अशा सूचनाही मंत्री राणे यांनी केल्या.

## मुरुडचे माजी नगराध्यक्ष मंगेश दांडेकर यांची राष्ट्रवादीत घरवापसी

**मुरुड : प्रतिनिधी**

मुरुड शहरातील शिंदे गटाचे प्रमुख नेते मंगेश दांडेकर यांनी आपल्या असंख्य कार्यकर्त्यांसह राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष खासदार सुनिल तटकरे यांच्या नेतृत्वाखाली आज प्रदेश कार्यालयात राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये जाहीर प्रवेश केला.

मंगेश दांडेकर यांच्या समवेत महात्मा ज्योतिबा फुले सोसायटीचे चेअरमन अजित गुरव, माजी शिक्षण सभापती नितीन पवार, अमित कवळे, शीघ्रे ग्रामपंचायतचे माजी सरपंच हाफिजू कबले, तेलवडे माजी सरपंच कृष्णा म्हात्रे, राकेश चोगले, विलास पाटील, निलेश पाडगे, इम्तियाज कडू आदींनी प्रवेश केला. या सर्वांचे पुष्पगुच्छ देऊन प्रदेशाध्यक्ष खासदार सुनिल तटकरे यांनी पक्षात स्वागत केले

दरम्यान मंगेश दांडेकर हे पुन्हा स्वगृही परतल्याने प्रदेशाध्यक्ष खासदार सुनिल तटकरे यांनी समाधान व्यक्त केले. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेश सरचिटणीस लतिफ तांबोळी, मुरुडचे तालुकाध्यक्ष फैरोज घलटे आदी उपस्थित होते.



## आपदा मित्रांना संसाधने उपलब्ध करून देण्याचे निर्देश

**अलिबाग : रामप्रहर वृत्त**

आपदा मित्र हे आपत्कालीन परिस्थितीत मदत करण्यासाठी अत्यंत महत्त्वाचे आहेत. त्यांना अधिक सक्षम व प्रभावी बनवण्यासाठी आवश्यक ती सर्व संसाधने, मदत जिल्हा प्रशासनाने उपलब्ध करून द्यावी असे निर्देश महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे यांनी दिले.

रायगड जिल्हाधिकारी कार्यालयात रायगड जिल्ह्यातील आपदा मित्रांची बैठक महिला व बालविकास मंत्री यांच्या अध्यक्षतेखाली घेण्यात आली. यावेळी त्या बोलत होत्या.या बैठकीला जिल्हाधिकारी किशन जावळे, पोलीस अधीक्षक आचल दलाल, उपवनसंरक्षक राहुल पाटील, निवासी उपजिल्हाधिकारी संदेश शिर्के, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी सागर पाठक यांसह विविध आपदा मित्र संस्थेचे प्रतिनिधी उपस्थित होते.

महापूर, दरड दुर्घटना, आग,रस्ते अपघात अथवा कोणतीही नैसर्गिक आपत्ती असो या घटनांमध्ये सर्वसामान्यांचा जीव वाचविण्याचं काम आपत्ती व्यवस्थापनातील आपदा मित्र करत आहेत. बोटी चालवने, तराबा हाकणं, दरीतील मृतदेह बाहेर काढणं, रस्ते अपघातातील जखमींना तात्काळ प्राथमिक आरोग्य सुविधा उपलब्ध करून देणं, यासह आपत्ती काळात कराव्या लागणाऱ्या अनेक मदतीसाठी ते सदैव तत्पर असतात. त्यांना यासाठी लागणारे साहित्य जिल्हा प्रशासनाने त्यांच्या मागणीनुसार उपलब्ध करून द्याव्यात. संबंधित संस्थांनी त्यांची यादी तात्काळ जिल्हा प्रशासनास पाठवावी अशा सूचना कु.तटकरे यांनी यावेळी दिल्या. आपत्ती ठिकाणी पोहोचण्यासाठी या संस्थांना वाहन तसेच आवश्यक सुविधा देण्यात याव्यात. जे आपदा मित्र नोकरी किंवा कामावर जात असतील तर त्यांचा हा सेवाकालावधी विना वेतन होणार नाही यासाठी संबंधित आस्थापना यांना आपत्ती व्यवस्थापन कायद्याअंतर्गत तरतुदी नुसार कळविण्यात येईल असेही कु. तटकरे यांनी सांगितले.यावेळी अपघात ग्रस्तांच्या मदतीसाठी सामाजिक संस्था खोपोली, साळुंखे रेस्कु टीम,सानप रेस्कु टीम, सिसकेप रेस्कु टीम चे प्रतिनिधी उपस्थित होते.

## त्रस्त वरसोली ग्रामस्थांची महावितरणवर कार्यालयावर धडक

**अलिबाग : प्रतिनिधी**

पाच दिवस सातत्याने होणाऱ्या खंडित वीजपुरवठ्यामुळे त्रस्त झालेल्या वरसोली ग्रामस्थानी मंगळवारी ( दि. २७) उपसरपंच मिलिंद कवळे यांच्या नेतृत्वाखाली महावितरणच्या कार्यालयावर धडक दिली. यावेळी कार्यकारी अभियंता शैलेशकुमार यांच्यासोबत शिष्टमंडळाने चर्चा केली. कार्यकारी अभियंता शैलेशकुमार यांनी येत्या काही दिवसात सर्व समस्यांचे निराकरण करण्यात येईल असे आश्वासन दिले.



वरसोली ग्रामपंचायत कार्यक्षेत्रात गेल्या ५ दिवसात सातत्याने विजपुरवठा दिवस–रात्र खंडित होण्याचे प्रकार होत आहे. पावसाळा तर आताच चालू झालेला आहे, पावसाळा चालू होत असताना दिवसा–रात्री केंव्हाही कंडक्टर तुटण्याचे प्रकार होत आहेत. जास्त वेळा हे प्रकार रात्रीचे होत आहेत, त्यामुळे ग्रामस्थांच्या तक्रारी ग्रामपंचायतीकडे येत आहेत.

रात्रीच्या वेळी लाईट गेल्यावर त्यावेळी वायरमन कर्मचारी उपलब्ध ठेवणे अवश्यक असून, तसेच रात्रीच्या वेळी लाईन पडल्यावर संपर्क कोणाला करणे, व त्यांचे नंबर चालू ठेवणेबावत संबधितांना सुचना देणे, किंवा फोन उचलण्याबाबत सुचना देणे. वरील कामांबाबत आपणाकडून तातडीने दखल घेऊन विक झालेले कंडक्टर तातडीने बदलून व असणा–या समस्या सोडविण्याबाबत आपणाकडून योग्यती तातडीने कार्यवाही करण्याची मागणी करण्यात आली.

यावेळी मिलिंद विजय कवळे यांच्यासह संजय पाटील, नितीन माळवी, हर्षल नाईक, नम्रता वर्तक, नमिता माळवी, संजय कवळे, नितीन खाडे, गौरीश घरत उपस्थित होते.

## वरुणराजाने महिला गृहोद्योगांचीही गणिते चुकविली

### उन्हाअभावी वाळवणीच्या पदार्थांची बाजारपेठेत कमतरता

**पोलादपूर : प्रतिनिधी**

यंदा ९ मेपासून अवकाळी पावसाने हजेरी लावल्यामुळे उन्हाअभावी वाळवणीच्या पदार्थांची बाजारपेठेमध्ये कमतरता निर्माण झाली असून महिला गृहोद्योगांची गणितंदेखील अवकाळी पावसामुळे यंदा चुकल्यामुळे लाडक्या बहिणींच्या या महिला गृहोद्योगांना राज्यसरकारने साथ देण्याची अपेक्षा व्यक्त होत आहे.



रायगड जिल्ह्यातील महाड आणि पोलादपूर तालुक्यांमध्ये महिला सक्षमीकरणासाठी महिला बचतगटांची निर्मिती मोठया संख्येने झाली असून अनेक महिला बचतगटांमार्फत सुरू असलेल्या महिला गृहोद्योगांना सूक्ष्म कर्ज, लघू कर्ज आणि मध्यम कर्जांचे वाटपदेखील करण्यात आले आहे. अनेक महिला बचत गटांना रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेमार्फत तसेच एचडीएफसी बँकेमार्फत प्रस्ताव करून पोलादपूर तालुक्यात सूक्ष्म कर्जांचे वाटप करण्यात आले आहे.

मे महिन्याच्या कडकडीत उन्हांत उडीद दाळ, पोहे, कैऱ्या, करवंद, आमरस, फणसाचे गरे, साबुदाणा आदी कच्चा माल मोठया प्रमाणात खरेदी करून पापड, कुरडया, लोणची, मिरगुंड, फेण्या, फणसपोळया, आंबापोळया आदी वाळवणीच्या पदार्थांचे मोठया प्रमाणात उत्पादन करण्याचे आडाखे बांधणाऱ्या महिला गृहोद्योगांचे आर्थिक गणित ९ मेपासून बरसण्यास सुरूवात झालेल्या अवकाळी पावसाने पूर्णपणे बिघडवले आहे.

सूक्ष्म कर्जदार महिलांना या कर्जांची परतफेड करण्याचेही आर्थिक बळ न राहिल्याने राज्यसरकारच्या महिला व बालविकास मंत्रालयाने कोकणातील उद्यमशील लाडक्या बहिणीच्या यंदा झालेल्या आर्थिक ओढा–ताणीकडे गांभिर्याने लक्ष देऊन गृहोद्योगामुळे आर्थिक फटका बसलेल्या महिलांना सानुग्रह अनुदान देण्याची मागणी होत आहे.

महाड तालुक्यातील नाते येथील देवळेकरबंधू गृहोद्योगाच्या संचालिका अस्मिता देवळेकर यांनी, लाडक्या बहिणींनी त्यांच्या सानुग्रह अनुदानाद्वारे घरच्याघरी उद्योगनिर्मिती केली आणि पावसाने या लाडक्या बहिणींवर वक्रदृष्टी केल्यामुळे हे गृहोद्योग अवकाळी पावसामुळेच यंदा नुकसानीत गेले असल्याचे सांगितले असून बँकांची सूक्ष्म कर्ज फेडून बँका वाचविता येतील मात्र, संसार वाचविण्यासाठी महिलांचे गृहोद्योग वाचविले गेले पाहिजेत, अशी अपेक्षा करून महिला व बालकल्याण मंत्रालयामार्फत महिला गृहोद्योगांना आर्थिक अनुदान देऊन यंदा अवकाळीच्या संकटातून तारण्याची गरज असल्याचे आवर्जून सांगितले.

## राज्य वस्तू संग्रहालयाबाबत तरुणांच्या संकल्पना मागवा!

### सांस्कृतिक कार्यमंत्री आशिष शेलार यांची सूचना

**मुंबई : प्रतिनिधी**

मुंबईच्या वांद्रे कुर्ला कॉम्प्लेक्स येथे उभे राहणारे राज्य वस्तू संग्रहालय कसे असावे, याबाबत राज्यातील तरुणांच्या नवनवीन संकल्पना समजून घेणे आवश्यक असून त्यासाठी स्पर्धा आयोजन करावे, अशी सूचना सांस्कृतिक कार्य मंत्री ॲड.आशिष शेलार यांनी आज येथे केली.



जागतिक वारसा व संग्रहालय दिनानिमित पु.ल.देशपांडे महाराष्ट्र कला अकादमी, प्रभादेवी येथे सांस्कृतिक कार्य विभागांतर्गत पुरातत्व व वस्तुसंग्रहालय संचालनालयाने कार्यक्रम आयोजित केला होता. यावेळी सांस्कृतिक कार्य मंत्री, ॲड.शेलार यांनी गेटवे ऑफ इंडिया या स्मारकांवर होणाऱ्या कार्यक्रमाचे बुकिंग करण्यासाठी तयार केलेल्या पोर्टलचे लोकार्पण केले. या निमित्ताने केलेल्या अध्यक्षीय भाषणात शासनाने जागतिक वारसा नामांकनासाठी केलेले प्रयत्न व भविष्यातील वाटचाल याची रूपरेखा मांडली.

मंत्री ॲड.शेलार म्हणाले की, मराठा लष्करी भूप्रदेशाबरोबर कोकणातील कातळशिल्प हा जागतिक वारसा या दृष्टीने महत्वाचा विषय असून तो जगासमोर मांडताना संशोधनात्मक पद्धतीने मांडला जावा. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या 'विरासत से विकास तक' या दूरदृष्टीची टप्याटप्प्याने अंमलबजावणी अपेक्षित आहे. भारतातील संग्रहालय चळवळ ही ब्रिटिश राज्यात उदयाला आली असल्याने त्यात वसाहतवादी दृष्टिकोन स्पष्टपणे दिसतो, असेही ते म्हणाले. भविष्यातील संग्रहालये ही भारतीय दृष्टिकोनातून तयार व्हावीत, ही अपेक्षा मंत्री ॲड.शेलार यांनी यावेळी व्यक्त केली.

## सिडको आपत्कालीन नियंत्रण कक्ष कार्यान्वित

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

सिडको महामंडळाचा आपत्कालीन नियंत्रण कक्ष २६ मे पासून ३० सप्टेंबर २०२५ या पावसाळी कालावधीमध्ये २४/७ तत्त्वावर कार्यान्वित करण्यात आला आहे. दरवर्षी पावसाळी कालावधीमध्ये सिडकोतर्फेनवी मुंबईतील सिडको अधिकार क्षेत्रातील नागरिकांकरिता आपत्कालीन नियंत्रण कक्ष कार्यान्वित करण्यात येतो.

पावसाळ्याच्या कालावधीमध्ये उद्भवणाऱ्या संभाव्य आपत्ती/दुर्घटना लक्षात घेता सिडकोचा सुसज्ज असा आपत्कालीन नियंत्रण कक्ष कार्यरत असतो. दिनांक २६ मे २०२५ रोजी सिडकोचे मुख्य दक्षता अधिकारी,सुरेश मेंगडे यांनी आपत्कालीन नियंत्रण कक्षाच्या तयारीचा व या कक्षाच्या माध्यमातून पार पाडल्याजाणाऱ्या सर्व सेवा व सुविधांचा आढावा घेतला.



त्याचप्रमाणे सर्व संबंधित नोडल अधिकाऱ्यांना नागरिकांच्या मॉन्सून संबंधित तक्रारींचे वेगाने निराकरण करण्याचे आदेश दिले.

सीबीडी बेलापूर येथील सिडको भवन इमारतीच्या तळ मजल्यावर असलेला हा नियंत्रण कक्षकार्यालयीन कामकाजाच्या दिवसांसहित शनिवार, रविवार तसेच सार्वजनिक सुट्टीच्या दिवशीही २४ तासकार्यरत राहणार आहे. या कक्षामार्फत आपत्कालीन स्थितीत अभियांत्रिकी विभाग, आरोग्य विभाग, अग्निशमन विभाग, सुरक्षा विभाग, उद्यान विभाग आदी महत्त्वाच्या विभागाचे कर्मचारी २४ तास संपर्कात असतील. सिडकोच्या आपत्कालीन नियंत्रण कक्षाद्वारे वृक्षांची पडझड/ वाहतुकीस अडथळा ठरणाऱ्या वृक्षांची छाटणी, रस्त्यावरील उघड्या गटारांची झाकणे पूर्ववत बसवणे, पूर/पूरसदृश परिस्थिती, रस्त्यांवरील खड्डे, रस्तेवा नाल्याजवळ साचलेला कचरा, व्यक्तींचे पाणीसाठ्याच्या ठिकाणी बुडणे, आग व आगीचे विविध प्रकार,साथीचे रोग, विषारी प्राणी चावण्यासंबंधी बाबी, इमारत कोसळणे, भूस्खलन, पाणी साचणे या आपत्तींची दखल घेण्यात येऊन त्याबाबत त्वरित कार्यवाही करण्यात येईल.

नागरिकांनी वरीलपैकी कोणतीही आपत्ती उद्भवल्यास पुढे देण्यात आलेल्या दूरध्वनी अथवा व्हॉटसप क्रमांकावर किंवा ई–मेलद्वारे सिडको आपत्कालीन नियंत्रण कक्षाशी संपर्क साधून आपत्तीसंबंधी माहिती द्यावी किंवा त्याबाबतची तक्रार नोंदवावी.

## एपीएमसीत गाळ रस्त्यावर पसरल्याने गैरसोय

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

नवी मुंबईत पडलेल्या मुसळधार पावसाने वाशीतील कृषी उत्पन्न बाजार समिती (एपीएमसी) परिसरातील फळ व भाजीपाला बाजाराच्या प्रवेशद्वारांवर पाणी साचले असून, नालेसफाईच्या नावाखाली उपसून ठेवलेला गाळ रस्त्यावर पसरल्याने व्यापारी आणि ग्राहकांची मोठी गैरसोय झाली.

सकाळपासून कोसळलेल्या पावसामुळे सखल भाग जलमय झाले. आधीच मर्यादित खरेदीला सामोरे जात असलेल्या बाजारात आता दुर्गंधी आणि घाणीचे साम्राज्य पसरले. शिल्लक राहिलेला आणि सडलेला माल टाकल्यामुळे रोगराईचा धोका अधिकच वाढला. माथाडी कामगार, व्यापारी आणि बाजारात येणारे ग्राहक यामधून अस्वस्थता आणि नाराजी व्यक्त केली जात आहे.

गाळ रस्त्यावरील गटारांमध्ये अडकत असून, गटारातून पाण्याचा निचरा होण्यास अडथळे निर्माण होत आहेत. त्यामुळे बाजाराच्या प्रवेशद्वारावरच गाळ आणि घाणीचे पाणी तुंबून राहिले आहे. या गाळामुळे परिसरात डासांचा प्रादुर्भाव वाढू लागला आहे. यामुळे केवळ बाजारातीलच नव्हे तर परिसरातील रहिवाशांच्या आरोग्यावरही विपरीत परिणाम होण्याची भीती व्यापाऱ्यांनी व्यक्त केली आहे.

. पावसामुळे उर्वरित गाळ वेळेत उचलता आला नाही. . बाजारातील कचरा दररोज उचलण्यात येतो. कुठे त्रुटी असल्यास व्यापाऱ्यांनी निदर्शनास आणून दिल्यास तात्काळ कारवाई करण्यात येईल, असे स्वच्छता अधिकारी किरण घोलप यांनी सांगीतले.

## रस्त्यावर आलेली माती तातडीने काढल्याने धोका टळला

**तळा : प्रतिनिधी**

तळा तालुक्यातील सोनसडे गावाच्या हद्दीत मुसळधार पडलेल्या पावसामुळे तळा– इंदापूर रस्त्यालगतच्या सोनसडे गावालगतच्या टेकडीवरची माती मोठ्या प्रमाणात रस्त्यावर वाहून आली होती. ज्यामुळे रस्ता निसरडा होऊन गंभीर अपघात होण्याची शक्यता होती. आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाने जेसीबीने त्वरीत माती काढल्याने वाहतूक सुरळुत होऊन होणारा धोका टळला.

सोनसडे गावालगतच्या टेकडीवरची माती रस्त्यावर वाहून आल्याची माहिती मिळताच स्वाती पाटील, अध्यक्षा, तालुका आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण–तळा (इन्सिडेन्ट कमांडर) तथा तहसीलदार तळा यांच्या सूचना व मार्गदर्शनाखाली तात्काळ कार्यवाही करण्यात आली.

तहसील कार्यालयातील मंगेश पालांडे, निवासी नायब तहसीलदार, चंद्रकांत राऊत, मंडळ अधिकारी, ग्राम महसूल अधिकारी विशाल वाघमारे, नितीन कदम, ज्योती पठाणे, महसूल सेवक किशोर चोगले असे पथक तात्काळ घटनास्थळी दाखल झाले.

या पथकाकडून वाहनचालकांना सावध करणे, अपघात टाळण्यासाठी वाहनांचे वेग नियंत्रणाचे काम करण्यात आले. तसेच सदर पथकाच्या निर्देशान्वये जेसीबी मशिनच्या साहाय्याने रस्त्यावरील माती बाजूला करून रस्ता वाहतुकीसाठी पूर्ववत करून देण्यात आला. त्यामुळे धोका टळला.



**दुखवटा**

### सुनंदा मुंबईकर

**उरण :** वेश्वी येथील सुनंदा शंकरशेठ मुंबईकर(वय ८३)यांचे बुधवार दिनांक १४मे रोजी वृद्धापकाळाने दु:खद निधन झाले आहे. त्यांचा दशक्रिया विधी शुक्रवार २३मे रोजी श्री क्षेत्र नाशिक येथे तर होम विधी रविवार २५ मे रोजी त्यांच्या राहत्या घरी वेश्वी येथे संपन्न झाला. .त्यांच्या मृत्यू पश्चात तीन मुले, चार मुली, १४ नातू असा त्यांचा कुटुंब परिवार आहे.



# आपत्ती कालावधीत अधिकारी, कर्मचाऱ्यांनी सतर्क राहावे

## पनवेल मनपा आयुक्तांच्या सूचना

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

आपत्ती कालावधीत पनवेल महानगरपालिकेच्या अधिकारी कर्मचाऱ्यांनी अधिक सतर्क राहणे आवश्यक आहे. ती आपली नैतिक जबाबदारी आहे. याचे भान सर्वांनी ठेवावे, अशा स्पष्ट सूचना आयुक्त तथा प्रशासक मंगेश चितळे यांनी आज दिल्या.



पनवेल परिसरात सोमवारी (दि.२६) ढगांच्या गडगडाट व विजेच्या लखलखाटासह झालेल्या २९६ मिमी झालेल्या पावसाने सर्वत्र दाणादाण उडवली. या पावसामुळे पनवेल शहरासह कळंबोली, खारघर, कामोठे, आदी परिसरात काही ठिकाणी पावसाचे पाणी साठल्याने नागरिकांची तारांबळ उडाली. या पार्श्वभूमीवर भावी काळातील अडीअडचणी दूर करण्यासाठी आपत्ती व्यवस्थापनाच्या दृष्टीने मुख्यालयात मंगळवारी (दि.२७) बैठक झाली. या वेळी ते बोलत होते.

या बैठकिस अतिरीक्त आयुक्त गणेश शेटे, परिवहन व्यवस्थापक कैलास गावडे, उपायुक्त सर्वश्री डॉ. वैभव विधाते, प्रसेनजित कारलेकर, रविकिरण घोडके, शहर अभियंता संजय कटेकर, सहाय्यक आयुक्त सर्वश्री सुबोध ठाणेकर, श्रीराम पवार, डॉ.रूपाली माने, उपअभियंता विलास चव्हाण, आरोग्य विभाग प्रमुख अनिल कोकरे, कार्यकारी अभियंता सुधीर सांळुखे, राजेश कर्डिले, चारही प्रभाग अधिक्षक, मुख्य जनसंपर्क अधिकारी डॉ. राजू पाटोदकर, अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

या बैठकीमध्ये चारही प्रभागामध्ये विविध ठिकाणी साठलेल्या पाण्याच्या ठिकाणांची माहिती आयुक्तांनी घेऊन या ठिकाणच्या पाण्याच्या निचरा होण्याच्यादृष्टीने अधिकचे पंप लावण्याबाबत आयुक्तांनी सूचना केल्या, तसेच नाले सफाईचे पुर्ननिरीक्षणकरून अधिकचे मनुष्यबळ नियुक्त करण्याबाबत आयुक्तांनी संबधित विभागास निर्देश दिले. तसेच सोमवारी काही रेल्वे स्टेशन परिसरात बाहेर पाणी साठल्याने नागरिकांना अडीअडचणीचा सामना करावा लागला. या पार्श्वभूमीवर रेल्वे प्रशासनास पत्राद्वारे सूचित करणयाबाबत उपायुक्तांना सूचना दिल्या. त्याचप्रमाणे बांधकाम विभाग, एमएसआरडीसीलादेखील पत्र देण्याबाबत आयुक्तांनी सूचना दिल्या.

भौगोलिक दृष्ट्या कळंबोली खोल भागात असल्याने सोमवारी भरती काळात जादा पाऊस पडल्याने त्याठिकाणी मोठ्या प्रमाणात पाणी साठले, आजच्या बैठकित आयुक्तांनी या ठिकाणी जादा पंप लावण्याचे आदेश दिले. तसेच कळंबोलीमधील मुख्य नाल्यावरती तातडीने फ्लिप गेट बसविण्याबाबत आयुक्तांनी बांधकाम विभागास सूचित केले.

याबरोबर नावडेमध्ये नाल्यातील पाणी तुंबल्याने नागरिकांना मोठ्या संकटाला सामाना करावा लागला, याबाबत आयुक्तांनी माहिती घेऊन याठिकाणी पुन्हा पाणी साठणार नाही यासाठी आवश्यक सूचना दिल्या. याबरोबरच कामोठे व पनवेल दोन्ही प्रभागातील कालच्या परिस्थितीचा आढावा आयुक्तांनी घेऊन सतर्क राहण्याच्या सूचना सर्व अधिकाऱ्यांना दिल्या.

# ट्रेलरवर कार धडकून महिलेचा मृत्यू; तीन जण जखमी

**पनवेल : वार्ताहर**

पनवेल येथून जेएनपीटीच्या दिशेने जाणाऱ्या ट्रेलर चालकाने भररस्त्यात धोकादायकरीत्या ट्रेलर थांबवल्याने पाठीमागून येणारी भरधाव कार ट्रेलरवर धडकून झालेल्या अपघातात कारमधील महिलेचा मृत्यू, तर कारचालकासह इतर तिघेजण गंभीर जखमी झाल्याची घटना पनवेलजवळच्या पुष्पक नगर येथे घडली.

रेश्मा रवींद्र तोरस्कर (वय ४६) असे या अपघातात मृत्यू झालेल्या महिलेचे नाव आहे. राकेश रवींद्र तोरस्कर (वय २५), गितेश गोपाळ कुलये (वय ३२) व स्नेहा राजेंद्र जाधव (वय २०) अशी या अपघातातील जखमींची नावे आहेत.

तोरस्कर कुटुंबीय व त्यांचे नातेवाईक मुंबईत नेपेन्सी रोड येथील जयप्रकाश नगरमध्ये ५ राहतात. तोरस्कर कुटुंबीय संगमेश्वर येथील आपल्या मूळ गावी गेले होते. त्यानंतर ते सर्वजण त्यांच्या कारने मुंबईत परतत होते. त्यांची कार रेश्मा यांचा मुलगा राकेश तोरस्कर चालवत होता. त्यांची कार पनवेल जेएनपीटी मार्गावर पुष्पक नगर जवळ आली असताना जेएनपीटीच्या दिशेने जाणाऱ्या ट्रेलरचालकाने अचानक भररस्त्यात ट्रेलर थांबवला. त्यामुळे पाठीमागून भरधाव वेगाने येणारी तोरस्करची कार या ट्रेलरवर धडकली व ट्रेलरच्या पाठीमागे अडकून पडली.

या अपघातात रेश्मा यांचा मृत्यू झाला, तर राकेश, गितेश व स्नेहा असे तिघेजण गंभीर जखमी झाले. या अपघाताची माहिती मिळताच पनवेल शहर पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत या सर्व जखमींना रुग्णालयात दाखल केले. त्यानंतर पोलिसांनी या अपघाताला जबाबदार असलेला ट्रेलरचालक शंभू प्रेमचंद कुमार याच्याविरोधात गुन्हा दाखल करून पुढील कारवाई सुरू केल्याचे पोलिसांनी सांगितले.

# क्रेनच्या धडकेत पाणी विक्रेत्याचा मृत्यू

**पनवेल : वार्ताहर**

मुंब्र्याकडून पनवेलच्या दिशेने जाणाऱ्या भरधाव क्रेनची रस्त्यावर पाणी विकणाऱ्या व्यक्तीला धडक लागल्याने झालेल्या अपघातात त्याचा मृत्यू झाल्याची घटना मुंब्रा-पनवेल मार्गावरील धानसर येथील शिळफाटा टोलनाक्याजवळ घडली.

तळोजा पोलिसांनी या अपघाताप्रकरणी क्रेन चालकाविरोधात गुन्हा दाखल करून त्याला ताब्यात घेतले आहे. राजू भोसले (वय ४८) असे या पाणी विक्रेत्याचे नाव असून तो मुंब्रा-पनवेल मार्गावरील शिळफाटा टोलनाक्याजवळ राहत होता. तसेच तो टोलनाक्यावर पाण्याच्या बाटल्या विकण्याचे काम करत होता. राजू तेथील टोल नाक्यावर थांबणाऱ्या वाहन चालकांना पाणी विकण्यासाठी रस्त्यावर उभा असताना, पनवेलच्या दिशेने येणाऱ्या भरधाव क्रेनची राजू भोसले याला धडक लागली, यात राजू गंभीर जखमी झाल्याने त्याला रुग्णालयात दाखल करण्यात आले.

# उरण येथे शनिदेव जन्मोत्सव



**उरण : वार्ताहर**

उरण गणपती चौक येथील हनुमान मंदिरातील शनिदेव जन्मोत्सव सोमवारी (दि.२६) साजरा करण्यात आला.

सकाळी महापूजा, आरती करण्यात आली. श्री हनुमान प्रासादिक भजन मंडळ यांचे भजन दुपारी सकाळी १० ते १२ वाजता शनिदेव दुपारी १२.१५ वाजता शनिदेव जन्मोत्सव साजरा करण्यात आला. १२ ते ३ वाजेपर्यंत महाप्रसाद, सायंकाळी ६ ते ७ ह.भ.प. भालचंद्र म्हात्रे यांचे प्रवचन, सायंकाळी ७ ते ९ पर्यंत श्री गजानन प्रासादिक भजन मंडळ यांचे भजन रात्री ९ वाजता महाआरती करण्यात आली, असे मंडळांनी सांगितले.

श्री हनुमान जन्मोत्सव संमाजिक मंडळाचे अध्यक्ष विपुल पारेख, उपाध्यक्ष ह.भ.प. भालचंद्र म्हात्रे, सचिव रोहित पाटील, खजिनदार मधुकर नाईक, सहसचिव ॲड. रेखा पाटील, सल्लागार जगदीश भोईर, सहखजिनदार मनोज म्हात्रे, व्यवस्थापक नितीन वर्तक, श्रीमती निर्मला ममताबादे व कार्यकारी सभासद रघुनाथबुवा, हातनोलकर, चंद्रकांत साठे, धनंजय भागवत महाराज, प्राजक्ता भागवत, मनोज म्हात्रे, महेश अधिकारी, सुविधा म्हात्रे तसेच सर्व सभासदांचे सहकार्य मिळाले.

# जमिनीखाली दडवलेला गांजा हस्तगत

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

अमली पदार्थ विक्रेत्यांचा कणा मोडून काढण्यासाठी नवी मुंबई पोलिसांनी ऑपरेशन प्रहार अंतर्गत मोहीम उघडली. याच मोहिमेमध्ये शुक्रवारी पहाटेपासून एकाच दिवशी नवी मुंबईतील ४८ वेगवेगळ्या ठिकाणी धाडी मारण्यात आल्या. तळोजा येथील पालेखुर्द या गावात शुक्रवारच्या या धाडसत्रात जमिनीखाली ड्रममध्ये गाढून ठेवलेला १३ किलोग्रॅम वजनाचा २६ लाखांचा गांजा हस्तगत करण्यात पोलिसांना यश आले.

टपरीसारख्या दिसणाऱ्या या घरात पोलिसांना तब्बल ३७ लाख २७ हजारांचा गांजा सापडला. मागील अनेक वर्षांपासून पालेखुर्द गावात भाड्याने राहणाऱ्या विक्रीत सामील असणाऱ्या या कुटुंबाचे मूळ गाव उत्तर प्रदेशातील दुधारा येथील आहे. ही टपरी दिखाव्यासाठी आहे. टपरीआडून ५० वर्षीय सरीफुन्नीशा अब्दुलजलील खान ही महिला हा व्यवसाय चालवते. पोलीस पथकाने अचानक धाड मारल्यावर सरीफुन्नीशा हिच्याकडे सुरुवातीला खाटेवरील चादरीखाली पाच किलो वजनाचा गांजा सापडला.

तिने हा गांजा मुंब्रा येथून आणल्याचे पोलिसांना सांगितले. तसेच तिची २५ ते ३० वर्षे वयाची दोन मुले यामध्ये मदत करतात. पोलिसांना एका प्लास्टिक ड्रमच्या खाली खड्डा दिसला. या खड्ड्याखाली असलेला ड्रम बाहेर काढल्यावर त्यात १३ किलो १६४ ग्रॅम वजनाच्या गांजाचा साठा लपवलेला मिळाला.

# गांजा बाळगल्याप्रकरणी कारवाई

**पनवेल :** गांजा हा अंमली पदार्थ जवळ बाळगल्याप्रकरणी एका व्यक्तीविरोधात पनवेल शहर पोलिसांनी कारवाई केली आहे.

पनवेल रेल्वे स्टेशन रोडवरील साईबाबा मंदिराच्या बाजूला चिरंजीत पहाडी (वय ४२, रा.कळंबोली) हा तळाहातावर हिरवट मळकट रंगाची पाने फुले असलेला गांजा हा अंमली पदार्थ त्याच्या हाताच्या अंगठ्याच्या सहाय्याने मळून मळालेला पाला मातीच्या चिलीममध्ये भरून जळत्या काडीने पेटवत होते.

या वेळी पनवेल शहर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ निरीक्षक नितीन ठाकरे यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक प्रकाश पवार व पोलीस शिपाई विशाल दुधे आदींच्या पथकाने सदर इसमाला ताब्यात घेवून त्याच्या विरुद्ध अंमली पदार्थ विरोधी कायदा १९८५ चे कलम ८ (क), २७ अन्वये कारवाई केली आहे.





**पनवेल : भाजप युवा मोर्चा तालुका सरचिटणीस विश्वजीत पाटील यांनी त्यांच्या वाढदिवसानिमित्त चिपळे येथील शिवमंदिर व संपूर्ण मंदिर परिसर स्वच्छ करून घेतला. यासोबतच मंदिर परिसर येथे वृक्षारोपण करण्यात आले. याशिवाय शांतिवन येथील शुभम सेवा आश्रम येथे भोजन देण्यात आले. दरम्यान, आमदार प्रशांत ठाकूर व भाजपचे ज्येष्ठ नेते अरुणशेठ भगत, जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, सरचिटणीस नितीन पाटील यांनी विश्वजीत पाटील यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या.**





**पनवेल : शहरात सोमवारी झालेल्या मुसळधार पावसामुळे अनेक घरांमध्ये पाणी गेले होते. यामध्ये रोहिदासवाडा येथे मोनिका जाधव, मारुती लाईन आळी येथील दातारे, दिलीप पाटील, कुंभार वाडा राजेंद्र पाठारे, कोळीवाडा येथील घरांमध्ये पाणी शिरले. या ठिकाणांची माजी नगरसेविका दर्शना भोईर यांनी पाहणी करून महापालिकेला पंप लावण्याचे सूचित केले, जेणेकरून पुन्हा अशी परिस्थिती येऊ नये. यासोबतच पाण्याचा निचरा करण्यासाठी गटार वळविण्यास सुचविले. या पाहणीवेळी त्यांच्यासोबत महापालिकेचे किरण पाटील, महेंद्र भोईर आदी उपस्थित होते.**

# अहिल्यादेवी होळकर जयंतीनिमित्त भाजपतर्फे उपक्रम

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पुण्यश्लोक राजमाता अहिल्यादेवी होळकर यांच्या ३०० व्या जयंतीनिमित्त भाजप पनवेल तालुका पूर्व मंडळाच्या वतीने सामाजिक आणि धार्मिक उपक्रम राबवण्यात आले. या उपक्रमांतर्गत शिवकर आणि चिपळे येथील प्राचीन शिवमंदिर परिसरात स्वच्छता मोहीम, धार्मिक कार्यक्रम, शंखनाद आणि वृक्षारोपण अशा विविध सामाजिक व आध्यात्मिक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले.







राजमाता अहिल्यादेवी होळकर यांचे जीवनकार्य म्हणजे सेवा, समाजभान, धर्मश्रद्धा आणि न्यायनीती यांचे प्रतीक होते. त्यांच्या कार्याचा गौरव करत पनवेल भाजप पूर्व मंडळाने हा उपक्रम घेतला. यामध्ये पदाधिकारी, ग्रामस्थ, कार्यकर्त्यांनी सक्रिय सहभाग घेतला आणि परिसराच्या स्वच्छतेबरोबरच जनजागृतीचा संदेश दिला. शिवकर येथील श्री शंकर मंदिरात सकाळपासूनच वातावरण भक्तिमय होते. सर्वप्रथम मंदिर परिसरात स्वच्छता अभियान राबवण्यात आले. त्यानंतर सामूहिक शिव महाआरती, शंखनाद आणि भजनांचा कार्यक्रम झाला. या वेळी अनेक भाविकांनी उपस्थित राहून अध्यात्मिक वातावरणात सहभाग घेतला. चिपळे येथील शिवमंदिरातही स्वच्छता मोहिम राबवण्यात आली. कचऱ्याची विल्हेवाट आणि मंदिराभोवतालचा परिसर नीटनेटका करण्यात आला. या ठिकाणी देखील शिव महाआरती, शंखनाद, भक्तिगीते आणि भजनांचा कार्यक्रम संपन्न झाला. विशेषतः वृक्षारोपण करून पर्यावरण रक्षणाचा संदेश देण्यात आला.

हा उपक्रम आमदार प्रशांत ठाकूर, भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी यांच्या मार्गदर्शनाखाली आणि पनवेल तालुका पूर्व मंडल अध्यक्ष भूपेंद्र पाटील यांच्या नेतृत्वाखाली पार पडला. या कार्यक्रमाला विभागीय अध्यक्ष सुनील पाटील, अणेश ढवळे, युवा मोर्चा सरचिटणीस विश्वजीत पाटील, उपाध्यक्ष धनंजय पाटील, ह.भ.प. विनोद पाटील, सुभाष पाटील, समीर दिनकर पाटील, महेंद्र पाटील, विशाल पाटील, अभिजित फुलोरे, तन्मय पाटील, किरण पाटील, रोहित पाटील, पंढरीनाथ पाटील, समीर पाटील, विष्णू पाटील आदी पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी स्थानिक नागरिकांचाही उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. या उपक्रमाच्या माध्यमातून भाजप पनवेल तालुका पूर्व मंडळाने सामाजिक बांधिलकी, धार्मिक श्रद्धा आणि पर्यावरणपूरक विचार यांचे सुंदर मिश्रण साधले.

# आपटा येथील पातळगंगा नदीला ऐन मे महिन्यात आला पूर

**रसायनी : प्रतिनिधी**

रात्रभर जोरदार वारा, विजाचा कडकडाट व मुसळधार पावसामुळे मे महिन्यात पहिल्यांदाच पाताळगंगा नदीला पूर आला आहे.



अनेक ज्येष्ठ नागरिकांनी सांगितले की आम्ही हे पहिल्यांदाच पाहिले आहे की मे मध्ये पाऊस आला आणि पूर आला पहाटे दोन पासून मुसळधार पाऊस सोसाटयाचा वारा आणि विजांचा कडकडाट चालू होता आणि सोमवारी दिवसभर पाऊस चालू आहे यामुळे आपटा येथील बापूजी देवस्थान, जुना कोळीवाडा येथे पाणी आले आहे तिथे रहदारी बंद झालेली आहे. आपटा खिंडीमध्ये थोडसे पाणी आलेले होते.

आपटा गावात प्रत्येकवर्षी गावात पुर येत असतो. १९८९ व २००५ या वेळी मोठा पुर आला. यासाठी या नदीचे संवर्धन करणे नदीतील गाळ काढणे, नदी खोल करणे व नदीचे काठ उंच व बळकट करणे बापुजी देवस्थानच्या ठिकाणी जेथून वाहनांची रहदारी सुरू असते. याच ठिकाणी नदीवर घाट बांधणे ही कामे केली पाहिजेत केंद्र सरकार व राज्य शासनाने यासाठी निधी उपलब्ध करून दिला पाहिजे.

# खारघरमधून तरुण बेपत्ता; पोलिसांकडून शोध



**पनवेल :** राहत्या घरातून कोणास काही एक न सांगता एक इसम कुठेतरी निघून गेल्याने तो हरविल्याची तक्रार खारघर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे. मंगेश शंकर जाधव (२७ रा.खारघर) असे या तरुणाचे नाव असून रंगाने सावळा, शरिराने मजबूत, उंची पाच फुट सात इंच, दाढी वाढलेली, नाक बसके, पाठीवर मस्क काढलेला डाग, शिक्षण बी.टेक त्याला मराठी, हिंदी, इंग्लिश भाषा अवगत आहे. त्याच्या अंगात जिन्स पॅन्ट व पांढरा शर्ट घातलेला आहे. या तरुणाबाबत कोणाला अधिक माहिती असल्यास त्यांनी खारघर पोलीस ठाणे किंवा म.पो.ना.मिना वळवी यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

## संपादकीय

# धोरणसातत्याचे यश

अर्थव्यवस्थेच्या आकारमानाच्या बाबतीत आपण आता जपानला मागे टाकून जगातील चौथी सर्वात मोठी अर्थव्यवस्था बनलो आहोत. आजच्या जागतिक परिस्थितीमुळे अनेक प्रगत अर्थव्यवस्था प्रभावित होत असताना भारताने आपली वाढ कायम राखली आहे. याचे श्रेय अर्थातच पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाला व त्यांच्या ध्येयधोरणांना जाते.

**भारताने जपानला मागे टाकून जगातील चौथी सर्वात मोठी अर्थव्यवस्था होण्याचा मान पटकावला आहे असे नीति आयोगाचे सीईओ बी. व्ही. आर. सुब्रह्मण्यम यांनी नुकतेच जाहीर केले. आपली अर्थव्यवस्था आता चार लाख कोटी डॉलरपर्यंत (ट्रिलियन डॉलर) पोहोचली असून भारतापुढे सध्या अमेरिका, चीन व जर्मनी या तीनच अर्थव्यवस्था आहेत. आयएमएफ अर्थात आंतरराष्ट्रीय नाणेनिधीच्या जागतिक अर्थव्यवस्थेचा भविष्यवेध घेणाऱ्या अहवालानुसार भारताने ब्रिटनला मागे टाकल्यानंतर दोनच वर्षात आता जपानलाही मागे टाकले आहे. देशांतर्गत वाढती मागणी, तरुण-कार्यक्षम लोकांची वाढती संख्या आणि धोरणात्मक सुधारणांमुळे भारताच्या अर्थव्यवस्थेला बळकटी मिळाली आहे. याउलट जपानच्या अर्थव्यवस्थेवर जागतिक व्यापारातील तणाव, लोकसंख्येतील घट आणि धोरणात्मक बदल यांच्यामुळे नकारात्मक परिणाम झाला आहे. विकासाची हीच गती आपण कायम ठेवली तर लवकरच भारत जर्मनीलाही मागे टाकेल असा विश्वासही नीति आयोगाच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी व्यक्त केला आहे. जगभरावर युद्धजन्य परिस्थितीमुळे मंदीचे सावट असताना भारत मात्र आपला प्रगतीचा वेग टिकवून आहे. मोदी सरकारच्या 'गुड गव्हर्नन्स', 'मेक इन इंडिया', 'स्टार्टअप इंडिया', 'डिजिटल इंडिया' अशा अनेक योजनांनी २०१४ पासून देशाच्या अर्थव्यवस्थेला योग्य दिशेने नेऊन आजच्या भरभक्कम स्थैर्यापर्यंत आणले आहे. जागतिक स्तरावर आजच्या घडीला भारतीय अर्थव्यवस्था सर्वात वेगाने वाढ साधते आहे. आयएमएफच्या अहवालानुसार भारताचा नॉमिनल जीडीपी आर्थिक वर्ष २०२५-२६ मध्ये ४१८७.०१ अब्ज अमेरिकी डॉलर इतका राहील. हा आकडा जपानच्या अंदाजित ४,१८६.४३ अब्ज अमेरिकी डॉलरच्या जीडीपीपेक्षा वरचढ असणार आहे. भारताचा विकासदर सध्या साडेसहा टक्क्यांच्या आसपास आहे. गेल्या काही वर्षांत वाढलेली अंतर्गत मागणी हे भारतीय अर्थव्यवस्थेचे सर्वात मोठे बलस्थान आहे. जगभरातील तमाम देशांना आज हीच बाजारपेठ खुणावत असते. ग्राहक खर्च आणि गुंतवणुकीत सातत्याने वाढ, कर प्रणालीतील सुधारणा, डिजिटायझेशन, पायाभूत सुविधांमधील गुंतवणूक व सुधारणा आदींमुळे भारताच्या अर्थव्यवस्थेला बळकटी मिळाली आहे. अर्थात अर्थव्यवस्थेच्या बाबतीत आपण चौथ्या क्रमांकावर असलो तरी दरडोई उत्पन्नाच्या बाबतीत अद्याप खूपच मागे आहोत हेही लक्षात ठेवावे लागेल. उत्पादनक्षेत्र न वाढण्यासंदर्भातही आपल्याला उपाय योजावे लागणार आहेत. अमेरिका आणि चीनसारख्या महाबलाढ्य अर्थव्यवस्थांशी बरोबरी करणे सोपे असणार नाही. त्यासाठी दळणवळण, नियोजन यात मोठे बदल घडवावे लागतील. तरुणांची संख्या जगात सर्वाधिक असण्याचा फायदा भारताला मिळतोच आहे. त्यासोबतच आता आपण महिलांनाही उत्पादक कामांमध्ये सहभागी करून घेतले पाहिजे. अखेरीस लोकसंख्येत त्यांचा वाटा ५० टक्के आहे हे दुर्लक्षून चालणार नाही. शेजारी राष्ट्रांशी असलेले भू-राजकीय तणाव आपण प्राधान्याने संपुष्टात आणले पाहिजेत. तसे झाले तर अनिश्चिततेला आपसूकच शह मिळेल. अमेरिकेची आर्थिक स्थिती आणखी ढासळली तर अनेक देशांसाठी चीनपेक्षा भारत हा अधिक चांगला पर्याय असणार आहे. त्यामुळे देशाच्या आर्थिक विकासाच्या या वाटचालीत नागरिकांनीही आपली भूमिका जबाबदारीने निभावत राहिले पाहिजे.**

# रायगडच्या पर्यटन विकासाला वाहतूक कोंडीचा अडसर





डोळ्यांचे पारणे फेडणारे निसर्गसौंदर्य, तब्बल २४० किमी लांबीचा विस्तीर्ण समुद्र किनारा, निसर्गरम्य ठिकाणे, ऐतिहासिक व धार्मिक वारसे आणि स्थळे लाभलेला रायगड जिल्हा पर्यटनासाठी आंदण आहे. त्यामुळे महाराष्ट्रातीलच नव्हे तर संपुर्ण भारतातील पर्यटक, इतिहासप्रेमी, पर्यावरण अभ्यासक व भाविक उन्हाळी सुट्ट्यांचा आनंद घेण्यासाठी जिल्ह्यात दाखल होत आहेत. मात्र वाहतूक कोंडीमुळे पर्यटकांची मोठी गैरसोय होत आहे.

उन्हाळी सुट्ट्यांमुळे पर्यटक जिल्ह्यातील पर्यटनस्थळाकडे वळली आहेत. जिल्ह्यातील विविध समुद्र किनारे व पर्यटन स्थळांवर गर्दी वाढली आहे. येथील समुद्र किनारे, मंदिरे, ऐतिहासिक वास्तु, किल्ले, तीर्थक्षेत्र पाहण्यासाठी पर्यटकांचा ओघ प्रचंड आहे.

यामुळे पर्यटनावर अवलंबून असलेले हॉटेल व्यावसायिक, खानावळी, दुकानदार यांची सध्या चलती आहे. मात्र असे असले तरी येथे दाखल होणारे पर्यटक, भाविक व प्रवाशी वाहतूक कोंडीमुळे पुरते हैराण झाले आहेत. वाहतूक कोंडीमुळे पर्यटकांना तासंतास खोळंबून राहावे लागते. तसेच इच्छितस्थळी पोहचण्यास देखील उशीर होतो.

जिल्ह्यात मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्गासह राज्य व अंतर्गत मार्गाची अवस्था वाईट आहे. तसेच अनेक ठिकाणी रस्त्यांची कामे अर्धवट अवस्थेत सुरु आहेत. परिणामी येथे येणार्या पर्यटकांना खाचखळगे, खड्डे, अरुंद मार्ग आणि वारंवार होणारी वाहतुक कोंडी अशा अनेक समस्यांना सामोरे जावे लागत आहे. त्यामुळे याचा प्रत्यक्ष अप्रत्यक्षपणे फटका पर्यटन व्यवसायाला देखील बसत आहे. खराब रस्ते व वाहतूक कोंडी यामुळे असंख्य पर्यटकांनी जिल्ह्याकडे पाठ फिरविलेली पाहायला मिळत आहे. परिणामी येथील पर्यटन व्यवसायावर संकट ओढवले आहे.

### मुंबई-गोवा महामार्गाची रखडपट्टी

मुंबई-गोवा महामार्गाचा पहिला टप्पा पळस्पे ते इंदापूर ८४ किमी लांबीचा आहे. आणि मागील १६ वर्षापासून अजून पूर्ण झालेला नाही. अनेक ठिकाणच्या उड्डाणपूलांचे काम अजून बाकी आहे. त्यामुळे त्याच्या बाजूने खराब रस्त्यातून जावे लागते. उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी दोन दिवसापूर्वी या रस्त्याची पाहणी केली आणि माणगाव बायपास रस्त्याला साधारण दीड वर्ष जातील असे सांगितले. आणि उड्डाणपूल जून अखेरपर्यंत करण्याचा प्रयत्न आहे. असे म्हणाले पण एकूणच या रस्त्याच्या कामाची गती पाहता हे पावसाळ्यापूर्वी पूर्ण होतील असे वाटत नाही.

**खबरबात**
**धम्मशील सावंत**

### वाहतूक कोंडीने बेजार

मुंबई-गोवा या महामार्गावर माणगाव शहर व आजूबाजूला ३ ते ४ किमी मोठ्या प्रमाणात वाहतूक कोंडी असते. अवघे तीन ते चार किलोमीटरचे अंतर कापायला एक ते दीड तास वेळ लागला. पुढे कशेणे गाव ते इंदापूर आणि पुढे नगरोली गाव या ठिकाणी रस्ता अरुंद असल्यामुळे मोठ्या प्रमाणात वाहनांच्या रांगा लागलेल्या असतात. पुढे गेल्यावर तिसे गाव व कोलाड येथे उड्डाण पुलाचे काम सुरु असल्यामुळे तिथेही मोठ्या प्रमाणात वाहतूक कोंडीने वाहनांच्या रांगा लागलेल्या असतात.

कोलेटी पासून पुढे आमटेम गावापर्यंत उड्डाणपुलाचे सुरू असलेले काम, खराब व अरुंद रस्त्यामुळे वाहतूक कोंडी असते .तसेच खारपाडा पुलावर देखील अवजड वाहनांमुळे मोठ्या प्रमाणात कोंडी होते. याबरोबरच पळस्पे फाटा, कोन गाव व आजीवली येथे मोठ्या प्रमाणात वाहतूक कोंडीला सामोरे जावे लागते. पाली-खोपोली राज्य महामार्गावर देखील पाली फाटा ते इमॅजिका या ठिकाणी मोठ्या प्रमाणात वाहतूक कोंडी असते. शनिवार रविवारी तर यात आणखी भर पडते. त्यामुळे पर्यटक प्रवासी चाकरमानी पुरते बेजार होतात.

### इथेही वाहतूक कोंडी

पनवेल, पेण, अलिबाग, खोपोली, पाली, माणगाव, महाड, श्रीवर्धन, म्हसळा, रोहा या शहरात वाहतूक कोंडी नित्याची असते. जिल्ह्यातील अलिबाग- नागाव, आक्षी, रेवस, वरसोली, मुरुड-काशिद, श्रीवर्धन- दिवेआगर, हरिहरेश्वर, आदगाव येथील समुद्रकिनारे पर्यटकांना भुरळ घालतात. मात्र येथील अंतर्गत रस्ते अरुंद आहेत. त्यामुळे मोठी वाहने तसेच दोन्ही बाजूने वाहने जातांना अडथळा निर्माण होतो. आणि परिणामी वारंवार तेथे वाहतूक कोंडी होत आहे. श्रीवर्धन, बोर्लीपंचतन, अलिबाग शहरात देखील अरुंद रस्त्यामुळे कोंडी होते. त्यामूळे अनेक पर्यटकांचा हिरमोड होतो.

अष्टविनायकांपैकी दोन गणपती हे रायगडमध्ये आहेत. ते म्हणजे खालापुर तालुक्यातील महडचा वरदविनायक आणि सुधागड तालुक्यातील पालीचे बल्लाळेश्वराचे मंदिर. महडकडे जाणार रस्ता खूप अरुंद आहे. त्यामुळे वाहतुकीला अडथळा येतो. तसेच पालीतील अंतर्गत रस्ते खराब व अरुंद आहेत. त्यामुळे येथे प्रचंड वाहतूक कोंडी पहायला मिळते. परिणामी येथे येणाऱ्या भाविकांचे हाल होतात.

### गतिरोधकांचा त्रास

मुंबई-गोवा महामार्गावर इंदापूर ते पळस्पे दरम्यान अनेक ठिकाणी गतिरोधक आहेत. मात्र या गतिरोधकांना कोणतेही मोजमाप नाही. कुठे उंच गतिरोधक आहेत तर कुठे रुंद गतिरोधक आहेत. तर काही गतिरोधकांना पांढरे पट्टे देखील मारण्यात आलेले नाहीत. यामुळे वाहने जोरदार आदळतात तर काही वेळेला अपघात होतात तसेच वाहतूक सुद्धा मंदावते.

### अवजड वाहने व नियमांचे उल्लंघन करणारे चालक

रस्त्याच्या दुरावस्थेबरोबरच वाहतूक कोंडीला इतरही कारणे आहेत. त्याजोडीला अवजड वाहनांची मोठ्या प्रमाणात रेलचेल, रस्त्याच्या बाजूला उभी केलेली अवजड वाहने आणि याचबरोबर नियमांचे उल्लंघन करून मार्गीकेच्या पुढे जाणारे वाहन चालक हे तितकेच जबाबदार आहेत. अनेक वाहन चालक एका रांगेत सरळ जात असताना दुसऱ्या बाजूने वाहने पुढे नेत होती. त्यामुळे समोरून येणाऱ्या वाहनांचा मार्ग अडला आणि परिणामी वाहतूक कोंडी होते. शिवाय वाकण नाका आणि इतर नाक्यांवर थांबलेली वाहने देखील वाहतूक अडथळा ठरतात.

### योग्य नियोजन व शिस्त हवी

हि स्थिती सुधारण्यासाठी प्रशासनाने सर्व रस्त्यांचे रुंदीकरण व चांगल्या प्रकारे देखभाल दुरुस्ती करणे आवश्यक आहे. तसेच कोणताही रस्ता बनवितांना योग्य नियोजन करुन काम वेळेत पुर्ण करणे गरजेचे आहे. तसेच महामार्ग, राज्यमार्ग व अंतर्गत रस्ते रुंद करणे, रस्त्याच्या कडेची अतिक्रमणे हटविणे, आवश्यक तेथे नियमित वाहतूक पोलीस तैनात ठेवणे, बायपास मार्गांचा पर्याय देणे, आवश्यक तेथे अवजड वाहतूक बंद करणे, वाहतुकीच्या नियमांचे उल्लंघन करणाऱ्या वाहनचालकांवर कारवाई करणे आवश्यक आहे. तरच पर्यटकांचा अधिक ओघ जिल्ह्यात वाढेल आणि पर्यटन व्यवसायाला व विकासाला चालना मिळेल.

## बदलते तंत्रज्ञान

# मोटोरोला नवीन फोल्डेबल रेझर ६० अल्ट्रा लॉँच

स्मार्टफोन निर्माता कंपनी मोटोरोलाने १३ मे रोजी भारतात आपला नवीन फोल्डेबल फोन मोटोरोला रेझर ६० अल्ट्रा लॉँच केला आहे. या फोनमध्ये स्नॅपड्रॅगन ८ एलिट चिपसेट, ५० एमपी ट्रिपल कॅमेरा सेटअप, पुन्हा डिझाइन केलेले टायटॅनियम हिंज सारखे फीचर्स आहेत.मोटोरोलाचा दावा आहे की रेझर ६० अल्ट्रा वरील ७-इंचाचा डिस्प्ले कोणत्याही फोल्डेबल फोनचा सर्वात मोठा आणि सर्वात प्रगत डिस्प्ले असेल. कंपनीने ते त्यांच्या सोशल मीडिया हँडल द आणि ई-कॉमर्स वेबसाइट **ॲमेझान** वर शेअर केले आहे. कंपनीने या स्मार्टफोनमध्ये मोटो एआय २.० फीचर दिले आहे. स्मार्टफोनची किंमत ९९,००० रुपये असू शकते.मोटोरोलाचा हा नवीन फोल्डेबल डिव्हाइस प्रीमियम सेगमेंटमध्ये सॅमसंग गॅलेक्सी झेड फ्लिप ५ आणि ओप्पो फाइंड एन३ फ्लिपशी स्पर्धा करेल.



### स्पेसिफिकेशन्स

डिस्प्ले- ७-इंच, १.५ के पोल
रिफ्रेश रेट १६५ हर्ट्झ कमाल ब्राइटनेस३,००० निट्स
मुख्य कॅमेरा- ५० एमपी + ५० एमपी
फ्रंट कॅमेरा - ५० मेगापिक्सेल
प्रोसेसर -स्नॅपड्रॅगन ८ एलिट
ऑपरेटिंग- सिस्टम हॅलो UI (अँड्रॉइड १५)
बॅटरी आणि चार्जिंग ४,७०० एमएएच, ६५ वॅट्स
रंग पर्याय माउंटन ट्रेल, रिओ रेड, स्कारॅब
मोटोरोला रेझर ६० अल्ट्रा: स्पेसिफिकेशन्स

डिस्प्ले : फोनमध्ये ७ इंचाचा १.५K पोलेड ड्ढझज इंटरनल फोल्डेबल डिस्प्ले आहे. यात १६५ हर्ट्झ रिफ्रेश रेट, डॉल्बी व्हिजन सपोर्ट आहे. यासोबतच, ४ इंचाचा पोलेड एलटीपीओ कव्हर डिस्प्ले देण्यात आला आहे. कव्हर स्क्रीनला कॉर्निंग गोरिल्ला ग्लास सिरेमिक संरक्षण मिळते.

फोनच्या दोन्ही डिस्प्लेवर गोरिल्ला ग्लास सिरेमिक प्रोटेक्शन देण्यात आले आहे. प्रोसेसर आणि ओएस : कामगिरीसाठी, १६ जीबी एलपीडीडीआर ५एक्स रॅम + ५१२ जीबी यूएफएस ४.१ स्टोरेजसह क्वालकॉम स्नॅपड्रॅगन ८ एलिट चिपसेट देण्यात आला आहे. सेल्फी/व्हिडिओ कॉलसाठी. मोटो एआय २.० वैशिष्ट्यांद्वारे एआय इमेज ऑप्टिमायझेशन आणि व्हिडिओ एडिटिंग टूल्स प्रदान केले जातील.

# स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर

विनायक दामोदर सावरकर अर्थात वीर सावरकर यांचा आज जन्मदिन. विनायक दामोदर सावरकर हे खऱ्या अर्थाने बहुआयामी व्यक्तीमत्व होते. स्वातंत्र्यसैनिक, राजकारणी, समाजसुधारक, कवी व लेखक, हिंदू तत्त्वज्ञ ते भाषाशुद्धी व लिपिशुद्धी चळवळींचे प्रणेते अशा प्रत्येक क्षेत्रात सावरकरांचे योगदान अनन्यसाधारण आहे.



**निमित्त**

सावरकरांचा जन्म २८ मे १८८३ रोजी नाशिक जिल्ह्यातील भगूर या गावी झाल्या. दामोदर सावरकर यांना तीन अपत्य होती. बाबाराव सावरकर हे थोरले, विनायक सावरकर हे मधले तर नारायणराव सावरकर हे धाकटे होते. सावरकरांचे प्राथमिक शिक्षण नाशिकच्या शिवाजी विद्यालयामध्ये झाले. ते लहानपणापासूनच अत्यंत बुद्धिमान होते. वक्तृत्व, काव्यरचना याच्यावर त्यांचे प्रभुत्व होते. जिव्हा आणि लेखणी ते सारख्याच ताकदीने चालवत. त्यांनी वयाच्या तेराव्या वर्षी लिहिलेला स्वदेशीचा फटका, स्वतंत्रतेचे स्तोत्र या रचना त्यांच्या प्रतिभेची साक्ष देतात.

राष्ट्रभक्तसमूह ही गुप्त संघटना सावरकरांनी पागे आणि म्हसकर या आपल्या साथीदारांच्या साहाय्याने स्थापन केली. मित्रमेळा ही संघटना या गुप्त संघटनेची प्रकट शाखा होती. पुढे संस्थेचा विस्तार वाढत गेला आणि तिचे रुपांतर अभिनव भारत संघटनेमध्ये झाले. सावरकरांनी पुण्यामध्ये इ.स. १९०५ साली विदेशी कापडांची होळी केली. त्यानंतर श्यामजी कृष्ण वर्मा यांनी ठेवलेली शिवाजी शिष्यवृत्ती मिळवून कायद्याच्या अभ्यासासाठी सावरकर लंडनला रवाना झाले. देशाच्या स्वातंत्र्याचा ध्यास घेतलेल्या सावरकरांनी तेथे देखील आपले कार्य सुरूच ठेवले. लंडनमधील इंडिया-हाऊसमध्ये राहात असताना सावरकरांनी जोसेफ मॅझिनीच्या आत्मचरित्राचे मराठी भाषांतर केले. या भाषांतराला जोडलेल्या प्रस्तावनेत सावकरांनी सशस्त्र क्रांतीचे तत्त्वज्ञान विषद केले होते. त्या काळातील अनेक युवकांना ही प्रस्तावना म्हणजे स्वातंत्र्याचा बीजमंत्र वाटत असे. त्याच काळात त्यांनी इतर देशांमधील क्रांतिकारक गटांशी संपर्क साधून, बॉम्ब तयार करण्याचे तंत्रज्ञान आत्मसात केले. ते तंत्रज्ञान व २२ ब्राऊनिंग पिस्तुले त्यांनी भारतात पाठवली. त्यापैकीच एका पिस्तुलाने नाशिकचा कलेक्टर जॅक्सन याचा वध अनंत कान्हेरे या तरुणाने केला.

यानंतर सावरकरांना अटक करण्यात आली. अटक झाल्यानंतर त्यांची अंदमानाच्या काळकोठडीत रवानगी करण्यात आली. अंदमानातून सुटल्यानंतर सावरकरांना ब्रिटिशांनी रत्नागिरीत स्थानबद्ध केले. त्यानंतर हिंदू समाज एकजीव आणि संघटित करण्यासाठी सावरकरांनी रत्नागिरीत राहून कार्य केले. हिंदू समाजाच्या अध:पतनाला जातिव्यवस्था, चातुर्वर्ण्य व्यवस्था जबाबदार आहे. हे ओळखून त्यांनी जातिव्यवस्थेचा विरोध केला. आपल्या लेखनाने कोणी सनातनी दुखावेल याची चिंता न करता अंधश्रद्धा, जातिभेद यांवर त्यांनी कडाडून टीका केली. त्यांनी रत्नागिरीमधील आपल्या वास्तव्यामध्ये समाजसुधारणेसाठी अनेक कार्य केली. त्यांनी जावळपास ५०० मंदीरे अस्पृश्यांसाठी खुली केली.

अशा या थोर क्रांतीकाराचा, साहित्यित्यिकाचा, हिंदू संघटकाचा मृत्यू २६ फेब्रुवारी १९६६ रोजी मुंबईत झाला. **(साभार : इंटरनेट)**


**बातमीतील बात**




## आरोग्य प्रहर

# क्रॅनबेरी खाण्याचे आरोग्यदायी फायदे

बाजारात प्रत्येक ऋतूनुसार वेगवेगळी फळे उपलब्ध होत असतात. ही वेगवेगळी फळे आपल्या आरोग्यासाठी फायदेशीर असतात. लाल रंगाचे क्रॅनबेरीमध्ये अँटीऑक्सिडंट्स, विशेषतः प्रोअँथोसायनिडिन्स, सी, ई व के ही जीवनसत्त्वे, फायबर यांचे प्रमाण जास्त असल्याने ती आरोग्यदायी असतात. या पोषक घटकांमुळे क्रॅनबेरीला दाहकविरोधी, प्रतिजैविक आणि ते हृदय संरक्षणात्मक गुणधर्म असलेले सुपरफ्रूट म्हणून ओळखले जाते.



.१मूत्रमार्गाच्या संसर्गापासून बचाव - क्रॅनबेरी मूत्रमार्गाच्या संसर्गापासून बचाव करण्याच्या क्षमतेसाठी प्रसिद्ध आहे. क्रॅनबेरीचा रस किंवा पूरक आहाराचे नियमित सेवन केल्याने मूत्रमार्गाचा संसर्ग कमी होऊ शकते, विशेषतः ज्या महिलांना वारंवार संसर्ग होण्याची शक्यता जास्त असते.

२. रोगप्रतिकार शक्तीत वाढ - क्रॅनबेरीमध्ये क जीवनसत्त्व भरपूर प्रमाणात असते, जे एक अँटिऑक्सिडंट आहे आणि पांढऱ्या म्हणजे सैनिकी रक्तपेशींचे उत्पादन वाढवून आपली रोगप्रतिकार शक्ती मजबूत करते.

३. हृदयाच्या आरोग्याला चालना - क्रॅनबेरीमधील अँटीऑक्सिडंट्स, संयुगे कोलेस्ट्रॉलचे ऑक्सिडेशन रोखतात आणि रक्तवाहिन्यांच्या कार्यात सुधारणा करतात; ज्यामुळे एकत्रितपणे हृदयरोगाचा धोका कमी होतो.

४. पचनक्रियेचे आरोग्य राखण्यात मदत - पचनक्रियेत मदत करते आणि नियमित आतड्यांच्या हालचालींना प्रोत्साहन देतो. ज्यामुळे पचनक्रिया निरोगी राहते.

५. त्वचेच्या आरोग्यात सुधारणा - विशेषतः क जीवनसत्त्व हे अकाली वृद्धत्व निर्माण करणाऱ्या मुक्त रॅडिकल्सशी लढण्यास मदत करते. त्यामुळे संतुलित आहाराचा दैनंदिन जीवनात समावेश केल्यास सुरकुत्या, निस्तेजपणा व मुरुमांसह जळजळ कमी होते .

६. दातांच्या समस्या टाळण्यास साह्य - क्रॅनबेरीतील संयुगे दात आणि हिरड्यांना जीवाणू चिकटण्यापासून रोखण्यास मदत करतात. साखरेशिवाय सेवन केल्यास ही संयुगे दातांतील पोकळी, हिरड्यांचे आजार व प्लेक जमा होण्याचा धोका कमी करतात

७. रक्तशर्करेचे नियंत्रण त्यांच्यातील फायबरच्या प्रमाणामुळे रक्तप्रवाहात साखरेचे शोषण कमी होते, ज्यामुळे मधुमेहावर नियंत्रण ठेवणाऱ्या लोकांसाठी हे फळ उत्तम पर्याय ठरू शकते.

# पेण तालुक्यात पावसाचे थैमान



## गणेशमूर्ती कारखानदारांचे लाखो रुपयांचे नुकसान

**पेण : प्रतिनिधी**

पेण तालुक्यात पावसाने थैमान घातले असून घरांमध्ये दुकानांमध्ये तसेच सकल भागांमध्ये पाणी साठल्यामुळे जनजीवन विस्कळीत झाले आहे. पेण तालुक्यातील हमरापूर, जोहे कळवे विभागातील अनेक गणेशमूर्ती कारखान्यांमध्ये पावसाचे पाणी शिरल्याने गणपती कारखानदारांचे लाखो रुपयांचे नुकसान झाले आहे.

मागील दोन दिवस पडत असलेल्या मुसळधार पावसामुळे शहरातील पेण पेण नाका, विक्रम स्टँन्ड, बाजारपेठ, शंकर नगर, हुडको मैदान, कोळीवाडा देवआळी आदी ठिकाणी पाणी साचले होते. भोगावती नदी धुतडी भरुन वाहत आहे. तालुक्यातील वाक्रुळ-वरवणे रस्ता, नारा निंबाळवाडी रस्ता, लाखोले निंबाळवाडी रस्ता पावसाने खचल्याने या गावांतील ग्रामस्थ व वाहनचालकांना तारेवरची कसरत करावी लागत आहे. वाक्रुळ, कामार्ली, हनुमानपाडा, खारपाडा या गावांतील घरांमध्ये पाणी जाऊन ग्रामस्थांचे नुकसान झाले आहे.

सोनखार येथील गणपत म्हात्रे यांच्या भात खरेदी केंद्रात पाणी शिरून भाताचे नुकसान झाले आहे. पिंपळगाव येथील प्रकाश ढोकळे यांच्या घराची वॉल कंपाऊंड पडून नुकसान झाले आहे. दादर, उर्णोली, सोनखार, कळवे, जोहे, तांबडशेत, रावे, खरोशी, बळवली या गावांना जाणाऱ्या रस्त्यावर पावसाचे पाणी साचले आहे.

पेण तालुक्यात जोरदार पाऊस पडत असून यामुळे ज्या नागरिकांचे नुकसान झाले आहेत त्यांची प्राथमिक नोंद घेण्यात येत आहे. नागरिकांना मदतीची आवश्यकता भासल्यास आपत्ती व्यवस्थापनाची टिम तयार ठेवण्यात आली आहे, अशी नायब तहसीलदार प्रसाद कालेकर यांनी बोलताना दिली.

## खोपोलीतील काजूवाडीत महाकाय दगड रहिवासी क्षेत्रावर कोसळला

### सुदैवाने जीवित हानी नाही



**खालापूर : प्रतिनिधी**

खोपोलीतील दरड प्रवण क्षेत्र असणाऱ्या काजूवाडी सहकार नगर परीसरात दरड कोसळण्याची शक्यता असणाऱ्या भागाचे महाकाय दगड, गोटे व मातीचा काही भाग कोसळून रहिवासी भागात आल्याने परीसरात घबराटीचे वातावरण निर्माण झाले होते. या घटनेने आपत्कालीन यंत्रणा सतर्क होत रहदारीसाठी हा मार्ग बंद करण्यात आला, तर रहिवाशांना सतर्क राहण्याचे आवाहन करण्यात आले.

सोमवारी रात्री ९ वाजता भानवज मस्जिदच्या पाठीमागे सहकार नगरला जाणाऱ्या मार्गांवर काजू वाडीच्या टेकडीचा भाग कोसळला खोपोली नगरपालिका प्रशासनाने पडलेले मोठे दगड सुरक्षित ठिकाणी हलवले असून त्या ठिकाणी नागरिकांनी जाऊ नये सूचना देऊन प्रतिबंधात्मक योजना म्हणून रस्ता तात्पुरता बंद केला.

या ठिकाणी टेकडी वरील भाग ढासळून बराचसा ढिगारा अर्ध्या टेकडीवर अडकला आहे केव्हाही याठिकाणी पुन्हा भूस्खलन होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. खालापूर उपविभागीय पोलीस अधिकारी विक्रम कदम, निरीक्षक शितल राऊत तहसीलदार अभय चव्हाण, परिसराला भेट देऊन पाहणी केली व परिस्थितीचा आढावा घेतला.

## एनडीआरएफ पथक महाडमध्ये दाखल

**महाड : प्रतिनिधी**

संभाव्य नैसर्गिक आपत्ती आणि महापुराच्या पार्श्वभूमीवर २३ जवानांचे एनडीआरएफ पथक महाडमध्ये दाखल झाले आहे. मागील काही वर्षातील आपत्तीचे स्वरूप पाहता पावसाळ्यामध्ये एनडीआरएफचे पथक महाड मध्ये ठेवण्याचा धोरणात्मक निर्णय घेण्यात आला आहे, मात्र पाऊस थांबल्या नंतर हे पथक म्हणजे वराती मागून घोडे.

सदर पथकाचा महाड नगर परिषदेच्या दस्तुरी नाक्यावरील रमा विहारमध्ये कॅम्प लावला आहे. या पथकाकडे अद्ययावत उपकरणांसह चार फायबर होडी, वायरलेस सेट, अन्य सामग्रीचा समावेश आहे. आगामी काळात ही टीम महाड पोलादपूर तालुक्यातील प्राधान्याने दरडग्रस्त, पूरप्रवण गावांना भेटी देऊन तेथील नागरिकांमध्ये सुरक्षिततेसंदर्भात जागृती निर्माण करणार आहे.



## श्रद्धा पुनर्वसन केंद्राला मंत्री आदिती तटकरेंची सदिच्छा भेट

**कर्जत: प्रतिनिधी**

कर्जत तालुक्यातील वेणगाव ग्रामपंचायत हद्दीतील श्रद्धा पुनर्वसन केंद्राला महिला व बालकल्याण मंत्री आदिती तटकरे यांनी सदिच्छा भेट दिली. या दौऱ्यात त्यांनी संस्थेच्या कार्यपद्धतीची माहिती घेतली तसेच तेथे उपचार घेत असलेल्या निराधार महिलांची भेट घेऊन त्यांच्या प्रकृतीची चौकशी केली.

श्रद्धा रेहॅबिलिटेशन फाउंडेशन ही सामाजिक संस्था रस्त्यावर फिरणाऱ्या बेवारस व मतिमंद रुग्णांना उपचार देऊन त्यांचे पुनर्वसन करण्याचे कार्य गेली ३८ वर्षे सातत्याने करत आहे. संस्था दरवर्षी अशा हजारो रुग्णांचे पुनर्वसन करते. आतापर्यंत ११,१४५ रुग्णांचे पुनर्वसन, त्यात ३,३५१ महिला रुग्णांचा समावेश झालेला आहे. संस्थेचे संस्थापक आणि प्रमुख मानसोपचारतज्ज्ञ डॉ. भरत वाटवानी यांना त्यांच्या सेवाभावी कार्यासाठी रॅमन मॅगसेसे पुरस्कारानेही सन्मानित करण्यात आले आहे. श्रद्धा पुनर्वसन केंद्राचा कार्यसंघ सुमारे ५० सदस्यांचा असून त्यामध्ये डॉक्टर, नर्सेस, सोशल वर्कर्स, मेडिकल ऑफिसर्स व सहाय्यक कर्मचारी यांचा समावेश आहे. विजयकुमार कट्टी, (ट्री मॅन ऑफ ठाणे) यांचे विशेष सहकार्य संस्थेस लाभले आहे. या सेवाभावी कार्यासाठी संस्था देणग्यांवर अवलंबून आहे.



मंत्री तटकरे यांनी संस्थेच्या महिला वॉर्डला भेट दिली, महिला रुग्णांशी संवाद साधला आणि संस्थेच्या वृक्षारोपण उपक्रमाची माहिती जाणून घेतली. त्यांनी संस्थेच्या कामाची प्रशंसा करत सांगितले की, 'अशा संस्थांच्या कार्यामुळे समाजातील दुर्लक्षित घटकांना नवी उमेद मिळते. शासन स्तरावरून आवश्यक सहकार्य करण्यात येईल. या वेळी सहाय्यक मानसोपचार तज्ज्ञ डॉ. स्वराली कोंडविलकर यांनी संस्थेचे कार्य, रुग्णप्रती समर्पण आणि समाजासाठी सुरू असलेल्या प्रयत्नांची माहिती दिली. त्या म्हणाल्या, 'मंत्री आदिती तटकरे यांनी संस्थेला दिलेली भेट आमच्यासाठी प्रेरणादायी ठरली आहे. त्यांच्या भेटीमुळे आम्हाला नवीन ऊर्जा मिळाली असून महिला मनोरुग्णांसाठी आणखी व्यापक कार्य करण्याचा आमचा निर्धार दृढ झाला आहे.'

मंत्री आदिती तटकरे यांच्या सोबत कर्जतचे तहसीलदार धनंजय जाधव, सहाय्यक गटविकास अधिकारी प्रभाकर बोरकर, जिल्हा परिषदेचे माजी जिल्हा उपाध्यक्ष सुधाकर घारे, भाजपचे रमेश मुंडे, राष्ट्रवादीचे जिल्हा सरचिटणीस अशोक भोपतराव, पोलीस निरीक्षक सुरेंद्र गरड आदी मान्यवर उपस्थित होते. तसेच वेणगाव ग्रामपंचायतीच्या सरपंच अश्विनी पालकर यांनी अदिती तटकरे यांचे स्वागत केले. याप्रसंगी सदस्य जागृती पालकर, वासंती पालकर, वैशाली पालकर, श्वेता पालकर आदी उपस्थित होते.

## रोहयो अंतर्गत ग्रामपंचायत स्तरावरील विशेष शिबिरांना उत्तम प्रतिसाद

### जिल्हाभरातून १४ हजार ४७९ अर्ज प्राप्त

**अलिबाग : प्रतिनिधी**

महात्मा गांधी रोजगार हमी योजनेअंतर्गत रायगड जिल्ह्यातील सर्व ग्रामपंचायतस्तरावर नुकतेच विशेष शिबिरांचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिरांच्या माध्यमातून नागरिकांकडून वैयक्तिक लाभाच्या योजनेचे प्रस्ताव मागविण्यात आले होते. शिबिराना रायगड जिल्ह्यातील नागरिकांचा उत्तम प्रतिसाद लाभला असून १४ हजार ४७९ जणांचे अर्ज प्राप्त झाले आहेत.

ग्रामीण भागात रोजगार उपलब्ध करुन देणे, आणि कुशल व अकुशल कामांच्या मदतीने ग्रामीण भागातील उत्पन्न व पायाभूत सुविधा विकसित करणे हे उद्दिष्ट नजरेसमोर ठेवून रोहयो अंतर्गत ग्रामपंचायत स्तरावरील विशेष शिबिरे आयोजित करण्यात आली होती. वैयक्तिक लाभाच्या योजनेंतर्गत प्रति लाभार्थी फळबाग लागवड, वृक्ष लागवड, बांबू लागवड करण्यासाठी १ लाख ६९ हजार रुपयांचे अनुदान ३ वर्षांसाठी देण्यात येते तसेच वैयक्तिक विहीरीसाठी ५ लाख, शेतीची बांधबंधिस्ती व दुरुस्ती २५ हजार प्रति हेक्टरी, वैयक्तिक शौचालय १२ हजार, शोषखड्डा,



कंपोस्ट खड्डा ५ हजार, शेळी पालन शेड, कुक्कुटपालन शेड ५० हजार, गोठा शेड १ लाख ७७ हजार रुपये असा लाभ देण्यात येतो.

जिल्हाभरातून एकूण १४ हजार ४७९ अर्ज प्राप्त झाले असून, यामध्ये फळबाग लागवड १ हजार ९९९ अर्ज प्राप्त झाले असून, वैयक्तिक विहिरी १ हजार १९१, शेत बांधबंधिस्ती व दुरुस्ती १ हजार २९० तर उर्वरित कामांसाठी ९ हजार १९९ अर्ज प्राप्त झाले आहेत.

यापुढेही नागरिकांना वैयक्तिक कामांची मागणी करता येणार आहे. इच्छुक लाभार्थ्यांनी कामाच्या मागणीसाठी आपल्या नजीकच्या ग्रामपंचायत कार्यालय किंवा पंचायत समिती कार्यालयाशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

## *कर्जतमध्ये श्री शनैश्वर जयंती उत्साहात साजरी*

**कर्जत : प्रतिनिधी**

कर्जत शहरातील उल्हास नदीच्या काठावर असलेल्या श्री शनि मंदिरात श्री शनैश्वर जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. सोमवती आमावस्या दुपारी १२.१२पासून सुरु होणार असल्याने दुपार नंतरच धार्मिक समारंभ करण्यात आले.

रणजीत जैन आणि शोभा जैन या उभयतांच्या हस्ते होम हवन, पूजा, अभिषेक करण्यात आला. पुरोहित बाळू कानडे यांनी धार्मिक विधी केले. याप्रसंगी भाविकांनी हनुमान चालीसा आणि श्री शनि महात्म्याचे पठण केले. महाआरती नंतर महाप्रसादाने समारंभाची सांगता करण्यात आली. या प्रसंगी जैन बांधव उपस्थित होते.




**तनिष्का को- ऑप. हौंसींग सोसायटी लि., पनवेल**

**जाहीर नोटीस**

प्रस्तावित सहकारी संस्था इमारत पुर्नविकास योजने अंतर्गत अनुभवी सक्षम व योग्य विकसकाकडून जुनी इमारत पाडून पनवेल महानगरपालिका नियमांच्या आधीन राहून नविन इमारत बांधकाम संबंधित निविदा मागविण्याबाबत.

१. संस्थेचे नाव :- तनिष्का को-ऑप हौसिंग सोसायटी, पनवेल
२. संस्थेचा पत्ता :- मु. पो. ता. पनवेल रायगड सीटी. एस. नं १३३२.
३. संस्था नोंदणी नं :- आर.जी.डी / पी.डब्लू.एल / एच. एस.जी । टी. सी/१९०४.
४. भूखंडाचे वर्णनः- एकूण क्षेत्रफळ
५. अस्तित्वात असलेल्या इमारतीतीन सदनिका / शॉप संस्था :- ११.
६. निविदा उपलब्धता : सदर संस्थेच्या निविदा दि. २८/०५/२०२५ ते ०५/०६/२०२५ दरम्यान संस्थेच्या कार्यालयात सकाळी ११ ते २ या वेळेत मिळू शकते
७. निविदा दाखल करण्याचे ठिकाण संस्था - कार्यालय
८. निविदा स्विकारण्याची अंतिम तारिख ०१/०६/२०२५ ते ०७/०६/२०२५
९. सहकारी संस्था यांच्याकडे कोणतीही निविदा स्विकारण्याचा किंवा नाकारण्याचा अधिकार संस्थेच्या इमारत पुर्नविकास समितीस आहे

सही/- सही/-
सेक्रेटरी/ खजिदार चेअरमन

**तनिष्का को- ऑप. हौंसींग सोसायटी लि.**



**जाहीर नोटीस**

**दावा मिळकतीचे वर्णन**

**गाव-खानावळे, तालुका- पनवेल, जि. रायगड**

| गाव | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर.चौ. | आकार रु.पैसे |
|---|---|---|---|---|
| खानावळे | १ | १/ब | ०-२७-८० | ५.५८ |
| खानावळे | १३ | २/१ | १-४६-०० | १५.५० |
| खानावळे | १४ | - | ०-३४-९० | ५.५६ |
| खानावळे | १६ | १ | ०-४०-५० | ७.५८ |
| खानावळे | १६ | ३ | ०-४३-५० | ६.२८ |

तमाम जनतेस या नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, माझे अशिल मे. सॅफरॉन पार्क प्रोजेक्ट प्रा.लि. शेलटन सफायर, ४०६, ४०७ चौथा मजला सेक्टर १५, प्लॉट नं. १८/१९, सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई ४००६१४ नोंदणीकृत खाजगी आस्थापना तर्फे संचालक श्री. नरेंद्र मणीलाल बुटाला व श्री. प्रत्यक्ष नरेंद्र बुटाला यांनी पनवेल येथील मे दिवाणी न्यायाधीस वरिष्ठ स्तर साहेब यांचा कोर्टात स्पेशल दिवाणी मुकादमा दावा क्र.५८/२०२३ हा प्रतिवादी श्री. महादेव रामचंद्र पाटील राहणार खानावळे यांचे विरुध्द दिनांक ०३/०९/२०१२ रोजीच्या साठेकराराची विशेष पूर्तता करुन मिळण्याकरीता व निरंतर ताकदीकरीता ठरावा करिता नुकसान भरपाई करीता तद्नुषगिक मागण्या करीता वर नमूद भूखंडाबाबत ज्यास दिवाणी दाव्यामध्ये दावा भूखंड असे संबोधिले आहे. सदर दिवाणी दावा आज रोजी न्याय प्रविष्ठ आहे. सदर दाव्याच्या दावा मिळकतीचे वर्णन केलेल्या भूखंडाचे लीज पेंडन्सी हे सह. दुय्यम निबंधक पनवेल यांच्या कार्यालयात दस्त क्र पवल-४-१२३५३-२०१९ अन्वये दिनांक २३/१२/२०१९ रोजी नोंदणीकृत केलेले आहे.


सदर नोटीसद्वारे तमाम जनतेस असे सुचित करण्यात येते की, वर्णन केलेल्या दावा मिळकतबाबतचे कोणतेही व्यवहार हे माझ्या अशिलांच्या हक्कास व अधिकारास बाधा निर्माण करणे आणि त्यामुळे सदर मिळकती बाबतचे व्यवहार हे माननीय दिवाणी न्यायालय हे सदर दिवाणी दाव्यात जो हूकूमनामा पारित करतील त्याला अधीन राहून असतील म्हणून सदर दावा मिळकीबाबत कोणत्याही व्यवहार हा स्पेशल दिवाणी मुकादमा क्र. ५८/२०२३ च्या अधीन राहून असेल व सदर व्यवहाराची जोखीम हि संपूर्णतः दावा मिळकत खरेदी करण्याचा व्यक्तीची अथवा संस्थेची असेल आणि भविष्यात त्या व्यक्ती अथवा संस्थेस सदर दिवाणी दाव्यात पक्षकार केले जाईल आणि त्यातून होणाऱ्या संभाव्य परिणामास ती व्यक्ती अथवा संस्था स्वतः जबाबदार राहील याची नोंद घ्यावी. आज दिनांक २८/०५/२०२५ रोजी.

**सही /-**
**ॲड. अदिती बाळकृष्णा पाटील**
**वकील उच्च न्यायालय**
यशोकिरण सोसायटी, गाळा नं.१०
लोखंडी पाडा, पनवेल, विर सावरकर
चौकाजवळ, ता. पनवेल, जि. रायगड


## शेतकऱ्यांपुढे खरिपातील भात पेरणीचे नवे संकट

**माणगाव : प्रतिनिधी**

रायगड जिल्ह्यातील माणगाव तालुका हा प्रामुख्याने भात उत्पादनासाठी ओळखला जातो. येथील शेतकरी दरवर्षी २५ मेच्या आसपास धुळवापे (पूर्वपेरणी) करून खरीप हंगामाची सुरुवात करतात. ही पद्धत पारंपरिक असून जमिनीच्या नैसर्गिक आर्द्रतेचा उपयोग करून भाताच्या बीजांना अंकुरण्यासाठी मदत होते, मात्र या वर्षी १८ मेपासूनच अवकाळी पाऊस पडत असल्याने या अवकाळी पावसामुळे या महत्वाच्या पेरणीसाठी अनुकूल हवामान मिळाले नाही आणि परिणामी शेतकऱ्यांना खरीप हंगामातील धूळवाफे पेरणी करता आली नसल्याने माणगाव तालुक्यातील शेतकरी मोठ्या संकटात सापडला आहे. त्यामुळे खरीप हंगामातील भात पेरणीचे नवे संकट उभारले आहे.



यंदा १८ मे नंतर अवकाळी पावसाने सुरुवात केली. तो पाऊस अद्यापही थांबलाच नाही. त्यामुळे तालुक्यात धुळवापे पेरणीसाठी आवश्यक असलेली कोरडी आणि उष्ण हवामान मागील काही आठवड्यांपासून राहिलेले नाही. त्याऐवजी, अचानक येणाऱ्या अवकाळी पावसामुळे शेतामध्ये चिखल तयार झाला, जे पेरणीसाठी अयोग्य स्थिती आहे. काही ठिकाणी वीजांच्या कडकडाटासह आलेल्या पावसामुळे बी-बियाणेही खराब होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. यामुळे पारंपरिक वेळेनुसार धुळवापे पेरणी करता न आल्याने आगामी मुख्य भात पेरणीवर मोठे संकट उभे राहिले आहे.

दरवर्षी माणगाव तालुक्यातील शेतकरी सुमारे ७०० ते ८०० हेक्टर क्षेत्रावर खरीप हंगामात धुळवापफे पेरणी करतात. त्यानंतर सुमारे ७०००ते ८००० हेक्टर क्षेत्रावर भात लावणी होते. अनेक शेतकऱ्यांनी यासाठी आधीच बी-बियाणे आणि खतांचा साठा करून ठेवला होता. मात्र हवामानाच्या या अनिश्चिततेमुळे त्यांचा संपूर्ण नियोजन बिघडला आहे. आता पेरणीस विलंब झाल्यास भात पीक कमी येण्याची शक्यता आहे, तसेच कीड व रोगांचा प्रादुर्भाव वाढण्याचा धोका वाढतो. त्यामुळे उत्पादन खर्च वाढून उत्पन्नात घट येऊ शकते.

सरकारकडून हवामान बदलाच्या अनुषंगाने शेतकऱ्यांना मार्गदर्शनाची गरज आहे. कृषी विभागाने वेळीच मदतीचे हात पुढे करून शेतकऱ्यांना पर्यायी पिके, बदललेली पेरणी पद्धती आणि बियाण्यांची निवड याबाबत माहिती दिली, तर परिस्थिती काही प्रमाणात सावरण्याची शक्यता आहे. हवामानातील हे बदल केवळ एक हंगामी अडचण नाही, तर यामागे दीर्घकालीन हवामान बदलही जबाबदार आहे. त्यामुळे शाश्वत शेतीसाठी नव्या उपाययोजना आणि धोरणात्मक पावले उचलणे ही काळाची गरज आहे.

> **अवकाळी पावसामुळे तालुक्यातील शेतकऱ्यांना धुळफेक पेरणी करता आली नाही. साधारण २५ मे नंतर शेतकरी धुळफेक पेरणी करतो. त्या पेरणीपूर्वी पासूनच अवकाळी पाऊस पडत असल्याने पेरणीस विलंब झाला असला, तरी शेतकऱ्यांनी घाई न करता हवामान स्थिर होईपर्यंत थांबणे गरजेचे आहे. हवामान खात्याने पाऊस उघडेल असा अंदाज दिला असल्याने शेतकऱ्यांसाना दिलासा मिळेल. शेतकऱ्यांनी ज्या शेतांमध्ये वाफे तयार केले आहेत, त्या ठिकाणी पाऊस थांबल्यानंतर पेरणी करता येईल. तालुक्यातील केळगण, कुंभे भागात पाच ते सहा टक्के शेतकऱ्यांनी वरकस जागेवर धूळवाफे पेरणी केली आहे.**
>
> **-श्री. पडवळकर, तालुका कृषी अधिकारी, माणगाव**

# भाजपकडून अतिवृष्टीचा आढावा

## शिष्टमंडळाने घेतली नवी मुंबई मनपा आयुक्तांची भेट

**नवी मुंबई : प्रतिनिधी, बातमीदार**

नवी मुंबईत कोसळलेल्या अतिवृष्टीचा आढावा घेण्याकरीता आमदार मंदा म्हात्रे यांनी भारतीय जनता पक्षाच्या शिष्टमंडळ, नागरिकांसह नवी मुंबई आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांची भेट घेतली.

या वेळी आमदार मंदा म्हात्रे यांनी बोलताना सांगितले की, नवी मुंबईमधील बेलापूर येथे असलेले सिडको निर्मित पावसाळी जलउदंचन केंद्र सुमारे ४० वर्षे जुने आहे. त्याचे भूमिपूजन होऊन वर्षे झाले, मात्र अद्यापही त्याचे काम पूर्ण न झाल्याने झालेल्या पावसामुळे सीबीडी बेलापूर विभागात सखल भागात असलेल्या सेक्टर ४,५,११ येथे मोठ्या प्रमाणात पाणी साचले.

सकल भागातील दुकानात पाणी शिरून व्यापाऱ्यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. शहरात पूरसदृश्य



परिस्थिती निर्माण झाल्यामुळे नागरिकांच्या मनात काही अंशी भीतीचे वातावरण पसरले होते. याच पूरसदृश्य परिस्थितीचा आढावा घेण्यासाठी भाजप शिष्टमंडळासहित आपण आज महानगरपालिका आयुक्त यांची भेट घेतली आणि त्यांना निवेदन दिले असे आमदार मंदा म्हात्रे यांनी सांगितले.

या वेळी मान्सून काळात आपत्तीवर मनपाच्या सर्व विभागांनी समन्वयाने मात करत, नागरिकांना सर्व सुविधा पुरवण्याचे नियोजन करण्याचे निर्देश आमदार मंदा म्हात्रे यांनी आयुक्तांना दिले. तसेच आपत्ती काळात नागरिकांच्या जीविताच्या रक्षणाच्या अनुषंगाने वाशी येथील पावसाळी जलउदंचन केंद्राचे काम लवकरात लवकर करावे, शहरात राजमाता अहिल्यादेवी होळकर व राष्ट्रमाता जिजाऊ मॉसाहेब यांचा पूर्णाकृती पुतळा उभारण्यात यावा यावरदेखील आयुक्त यांच्याशी सकारात्मक चर्चा झाल्याचे आमदार मंदा म्हात्रे यांनी सांगितले.

या वेळी आमदार मंदा म्हात्रे यांच्या समवेत नवी मुंबई भाजप जिल्हाध्यक्ष डॉ. राजेश पाटील, राजू शिंदे, मनीष बिजलानी, मनोहर बाविस्कर, बेलापूर मंडळ अध्यक्ष अजय सिंग, सीवूड्स मंडळ अध्यक्ष सुधीर जाधव, नेरूळ पूर्व मंडळ अध्यक्ष कुणाल महाडिक, नेरूळ पश्चिम मंडळ अध्यक्ष भास्कर यमगर, वाशी मंडळ अध्यक्ष विकास सोरटे, प्रवीण भगत, संजय ओबेरॉय व व्यापारी सदस्य रायचंद जैन, कुकराज, महेंद्र जैन, अनिल यादव, महेश पटेल इत्यादी उपस्थित होते.





**पनवेल : मुसळधार पावसामुळे सोमवारी पोयंजे गाव मुख्य रस्त्याचा काही भाग पाण्यामुळे खचला व वाहतुकीची कोंडी झाली. या वेळी भाजपचे माजी तालुकाध्यक्ष तानाजी खंडागळे यांच्या मार्गदर्शनाखाली टीआयपीएल कंपनीमार्फत त्वरित जेसीबीची व्यवस्था करून रस्त्याचे काम पूर्ण करण्यात आले. विभागीय अध्यक्ष प्रवीण ठाकूर, पोयंजे अध्यक्ष रवींद्र गायकवाड तसेच कार्यकर्त्यांनी हे काम मार्गी लावून वाहनचालकांसह नागरिकांना दिलासा दिला.**

# भर पावसातही स्वच्छता मित्राने बजावले कर्तव्य

## नेरूळ विभागात पाणी न तुंबण्यासाठी तत्परता

**नवी मुंबई : बातमीदार**

नवी मुंबई शहरात सर्वत्र पावसाने धुमाकूळ घातलेला दिसून आला. नेरूळ विभागात जोरदार पावसामुळे पाणी साचून रस्ते जलमय झाले होते, मात्र या मुसळधार पावसात स्वच्छता मित्रांनी आपले कर्तव्य बजावत पाणी तुंबून न देता त्याचा निचरा होईल याबाबत प्रयत्न करताना दिसले. स्वच्छता कामगार आपल्या कर्तव्याला जागून नागरिकांच्या सेवेसाठी तत्पर असल्याचे दर्शन नेरूळ विभागात घडले असले तरी, संपूर्ण नवी मुंबईत स्वच्छता मित्रांनी आपले कर्तव्य बजावलेले पहायला मिळाले.

नेरूळमधील ही कृती रिपब्लिकन पक्षाचे प्रतीक यादव यांनी कॅमेऱ्यात टिपत आयुक्तांनी



अशा मेहनती स्वच्छता मित्रांचा सन्मान करण्याची मागणी केली. नेरूळ विभागातील स्वच्छता कामगारांनी भर पावसात भिजून रस्त्यांवर साचलेले पाणी काढताना कर्तव्य सेवा बजावली. नेरूळ विभागात साचलेल्या पाण्यामुळे वाहतुकीस अडथळा निर्माण होण्याची शक्यता होती, परंतु स्वच्छता मित्रांनी वेळेवर उपाययोजना केल्या. रस्ते स्वच्छ करण्याच्या झाडूने स्वच्छता कामगार पाणी काढताना दिसले.

रस्त्याकडेला असलेल्या आऊटलेटमधून पाणी काढत स्वच्छता मित्रांनी आपले कर्तव्य बजावत सेवा पुरवली. मुख्य म्हणजे अंगात रेनकोट, पायात गंबूट नसताना छत्री नसताना भर पावसात भिजत आपले कर्तव्य बजावताना स्वच्छता मित्र दिसले. करत या स्वच्छता मित्रांनी पाणी तुंबण्या पासून रोखले. काही वेळातच पाणी बाहेर काढून रस्ते मोकळे करण्यात आले. नागरिकांनी या स्वच्छता मित्रांचे मनापासून कौतुक करत त्यांचे आभार मानले.

# पत्रकार कक्षाला लागली गळती

**नवी मुंबई : बातमीदार**

नवी मुंबई शहरात मुसळधार पावसाने २६ मे रोजी २६ जुलैच्या प्रलयाची आठवण करून दिली. अनेक ठिकाणी शहरात पाणी तुंबले होते. मुसळधार पावसाचा फटका शहराला बसलेला असताना, त्यातच नवी मुंबईचे मुख्यालयदेखील यातून सुटलेले नाही. बाहेरून देखणी दिसत असलेली वास्तू आतून किती कुचकामी आहे. याचे उदाहरण या मुसळधार पावसात पाहायला मिळाले. मुख्य म्हणजे या मुख्यालयी पत्रकार कक्षालाच गळती लागलेली पाहायला मिळाली. पत्रकार कक्षात हे पाणी गळत होते.



# पनवेलमध्ये आनंदयात्रींची रंगभूमीवरील यात्रा



**नवी मुंबई : बातमीदार**

आनंदयात्री करंडक एकांकिका स्पर्धा २०२५चे आयोजन २१ ते २५ मेदरम्यान आद्य क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृह, पनवेल येथे करण्यात आले होते. एकूण ३७ संघांनी मुंबई, ठाणे, पुणे, कोल्हापूर, विदर्भ, मराठवाडा, बंगलोर अशा विविध भागातून ह्यात सहभाग घेतला. ही एकांकिका स्पर्धा आनंदयात्री ठाणे विभागाने (ठाणे कल्याण, नवी मुंबई आणि पनवेल) पुढाकार घेऊन आयोजित केली होती.

आनंदयात्री हा फेसबुक समूह असून जवळजवळ १३,०००हून अधिक सभासद विविध भागातून जोडले गेले आहेत. आताच्या व्हर्चुअल आणि धकाधकीच्या जीवनात गेले चार वर्षे हे सर्व सभासद एकमेकांशी फेसबुक द्वारे जोडलेले आहेत आणि एकमेकांबरोबर आयुष्याच्या यात्रेत आनंद लुटत आहेत.

या आनंदयात्रींना प्रत्यक्ष एकत्र आणण्याचे दोन प्रसंग वर्षातून येतात एक म्हणजे एकांकिका स्पर्धा आणि दुसरे म्हणजे आनंदयात्री क्रिकेट लीग. हे दोन्हीचे यशस्वी आयोजन आम्हास शक्य होते ते केवळ आणि केवळ आनंदयात्री मधील अनेक मदतीचा हात देणारे उद्योजक आणि दिलदार मित्र आणि स्थानिक प्रायोजक जे सढळ हाताने मदत करतात म्हणून असे आनंदयात्रीच्या ॲडमिन शुभदा ताकभाते म्हणाल्या.

रविवारी पार पडलेल्या बक्षिस समारंभासाठी पनवेलचे मुख्य जनसंपर्क अधिकारी डॉ. राजू पटोदकर, प्रसिद्ध लेखक सॅबी परेरा, भाजपचे सांस्कृतिक विभाग प्रमुख अभिषेक पटवर्धन, सुप्रसिद्ध नाट्य आणि सिने निर्मात्या कल्पना कोठरी इत्यादी उपस्थित होते. उत्कृष्ट एकांकिका प्रथम पारितोषिक 'कलम ३७५' या एकांकिकेला, तर द्वितीय पारितोषिक 'साडेसहा रुपयांचे काय झाले' या एकांकिकेला मिळाले. तर अभिनय पुरुषचे प्रथम पारितोषिक आनंद चव्हाण यांना आणि दितीय पारितोषिक योगेश गायकवाड यांना मिळाले. उत्कृष्ट अभिनय स्त्री चे प्रथम पारितोषिक स्वाती शिंदे आणि द्वितीय पारितोषिक शिल्पा दिक्षित यांना मिळाले.

# सीबीडी भाजी मार्केट येथे अजगराला जीवदान



**नवी मुंबई : बातमीदार**

पुनर्वसु फॉउंडेशनला सोमवारी सीबीडी बेलापूर सेक्टर १ भाजी मार्केट येथे एक भला मोठा सर्प असल्याची माहिती तेथील नागरिकांनी फोनवरून दिली.

त्वरित घटनेची माहिती सर्पमित्र अष्टविनायक मोरे यांना देण्यात आली, अष्टविनायक आपल्या सहकारी मित्र शिवम बनसोडे यांना घेऊन घटना स्थळी पोहचले. तेथील जागेची पाहणी केली असताना बिनविषारी दहा फुट लांबीचा अजगर असल्याचे समजले. यानंतर सर्पमित्र अष्टविनायक मोरे व शिवम बनसोडे यानीं रस्त्यावर येणाऱ्या वाहनांना थांबवले. बाजूला असलेले फुटपाट वरील चेंबर उघडून अजगराला कोणतीही दुःखापत न होता. दोन तासांच्या अथक प्रयत्नाने सुखरूप रित्या पकडले व अजगराला पकडल्या नंतर तेथील नागरिकांनी, भाजी विक्रेत्यांनी व्यापारी लोकांनी पुनर्वसु फॉउंडेशनचे कौतुक केले.

अनेक ठिकाणी साप व सरपटणारे प्राणी आपल्या परिसरात, घरात येण्याची शक्यता आहे. नागरिकांनी न घाबरता व सापाला न मारता जवळील सर्पमित्राला बोलवले. सर्पमित्र येऊन सापाला सुखरूपरित्या पकडून त्यांच्या अधिवासात म्हणजेच जंगलात सोडून देतील, असे सर्पमित्र अष्टविनायक मोरे यांनी नागरिकांना सांगितले.

# बीएमएसकडून मंत्र्यांना निवेदन

**उरण :** जेएनपीएचा ३६वा वर्धापन दिवस, केंद्रीय बंदरे, जहाजबांधणी आणि जलमार्ग मंत्री सर्बानंद सोनोवाल, केंद्रीय बंदरे, जहाजबांधणी आणि जलमार्ग राज्य मंत्री शांतनू ठाकूर आणि बंदरे, जहाजबांधणी आणि जलमार्ग मंत्रालयाचे सचिव टी. के. रामचंद्रन व इतर मान्यवरांच्या उपस्थितीत मुंबई येथे झाता.

या वेळी भारतीय पोर्ट व डॉक मझदूर (बीएमएस) महासंघाचे राष्ट्रीय महासचिव सुरेश पाटील, जेएनपीटी जनरल कामगार संघटनेचे सेक्रेटरी अनिल चिर्लेकर, बीएमएस रायगड जिल्हा संघटना मंत्री डी.पी. सोनावणे, रायगड जिल्हा बीएमएसचे उपाध्यक्ष राजेंद्र घरत, बीएमएस एमबीपीटीचे महासचिव दिपक जदाव ह्यांच्या नेतृत्वाखालील शिष्टमंडळाने बंदर आणि गोदी कामगारांच्या दीर्घकाळ प्रलंबित समस्यांबाबत मंत्री महोदयांना निवेदन दिले. सर्व प्रलंबित समस्या लवकरात लवकर सोडवून बंदर व गोदी कामगारांना योग्य तो न्याय देण्याचे आश्वासन मंत्रीमहोदयांनी दिले.



# सानपाडा येथे ढोल ताशा पथकांचे वाद्य पूजन

**नवी मुंबई : बातमीदार**

राज्याच्या विविध भागातील ढोल ताशा पथके वाद्य वाजवून गणेशोत्सव, नवरात्र उत्सव सारखे सण वर्षभर साजरे करीत असतात. या वाद्यांची सुरुवात करण्याकरिता नवी मुंबईत २५ मे २०२५ रोजी महाराष्ट्रातून पुणे, मुंबई, नवी मुंबई, ठाणे, वसई, भिवंडी, कल्याण, उल्हासनगर, पनवेल, उरण इत्यादी विविध भागातून आलेल्या ढोल, ताशा, लेझीम पथकांचा भव्य दिव्य वाद्य पूजन सोहळा झाला.



या वेळी माजी आमदार संदीप नाईक, माजी नगरसेवक सोमनाथ वास्कर, कोमल वास्कर, अजित सावंत, अविनाश जाधव, भाजप कोपरखैरने मंडळाचे अध्यक्ष राजू मढवी, सहाय्यक पोलीस आयुक्त मयूर भुजबळ, सानपाडा पोलीस ठाण्याचे वरिष्ठ निरीक्षक देविदास कटाळे, विनायक जाधव, ज्येष्ठ पत्रकार मारुती विश्वासराव, ढोल ताशा वाद्यपूजनाचे आयोजक शुभम जाधव आदी उपस्थित होते.

या वाद्यपूजन सोहळ्यात पुणे येथील प्रसिद्ध ढोल ताशा वादक शिवराज जाधव, सुप्रसिद्ध ताशा वादक प्रथमेश जाधव, शिवमुद्रा संस्थेचे ध्वजधारी सुनील मलगे, संस्कृती वाद्यपदकाच्या अध्यक्ष मनीष टाळे, मोरया वाद्य पथकाचे अमित पवार, जगदंबा ढोल ताशा पथकाचे पंचम दादा आदी मान्यवर सहभागी झाले होते. महाराष्ट्रातून आलेल्या ढोल ताशा पथकांचे सत्कार करण्यात आला. यानंतर प्रात्यक्षिकेही झाली.

# अहिल्यादेवी होळकर यांच्या जयंतीनिमित विविध कार्यक्रम

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

भारतीय जनता पक्ष नवी मुंबई जिल्ह्याच्या वतीने जिल्हाध्यक्ष डॉ. राजेश पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली राजमाता पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर ३००वी जयंती समारोह मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.

या निमित्ताने शोभा यात्रा, महिला मेळावा, युवा मेळावा व वेशभूषा स्पर्धा असे विविध सांस्कृतिक आणि सामाजिक उपक्रम झाले. या वेळी आयोजित शोभा यात्रा आकर्षण ठरली बाल अहिल्या आणि राजमाता अहिल्यादेवींच्या रूपातील वेशभूषा परिधान केलेल्या महिलांची उपस्थिती लक्षणीय होती. या शोभा यात्रेत बेलापूरच्या आमदार मंदा म्हात्रे, माजी जिल्हा अध्यक्ष रामचंद्र घरत, डॉ राजेश पाटील, सुहासिनी




नायडूसह महिला मोठया संख्येने सहभागी झाल्या होत्या.

ही शोभा यात्रा २४ मे रोजी सायंकाळी छत्रपती शिवाजी महाराज चौक, वाशी येथून सुरू झाली. यात मंडळ स्तरावरून आलेल्या महिला सहभागी झाल्या होत्या. यानंतर महिला मेळावा व वेशभूषा स्पर्धा कन्नड भवन, सेक्टर ९, वाशी येथे पार पडला. या स्पर्धेमध्ये महिलांनी पारंपरिक वेशभूषेत सहभाग घेत उत्साहात कार्यक्रम रंगवला. त्यानंतर युवक मेळावा झाला. युवकांनीही या कार्यक्रमात उत्स्फूर्त सहभाग नोंदवला. या वेळी युवकांना मार्गदर्शन करण्यात आले.

या कार्यक्रमांना नवी मुंबईतील आजी–माजी नगरसेवक, ऐरोली आणि बेलापूर मतदारसंघातील भाजपचे पदाधिकारी, कार्यकर्ते आणि महिला पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. प्रसंगी, पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर यांचा देदीप्यमान इतिहास सर्वांपर्यंत पोहचवणे, हा या उपक्रमाचा उद्देश असल्याचे भाजप नवी मुंबई जिल्हाध्यक्ष डॉ. राजेश पाटील यांनी सांगितले.

# आरोग्य शिबिराला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

रसायनी पाताळगंगा औद्योगिक परिसरातील बिर्ला कार्बन इंडिया प्रा. लिमिटेड, पाताळगंगा नदी आणि पर्यावरण संवर्धन चॅरिटेबल ट्रस्ट, टाटा मेमोरियल सेंटर मुंबई, कर्करोग प्रतिबंध विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने मॉन्टोरिया विलेज रिसॉर्ट चौक येथे सोमवारी (दि.२६) महाआरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.

शिबिराला महिला व पुरुषांनी आरोग्य तपासणी करून निदान जाणून घेतले. या वेळी तज्ञ डॉक्टरांनी जनजागृती व कर्करोगावर माहिती दिली. शिबिराचा लाभ २५० महिला व पुरुषांनी घेतला. या वेळी निखिल भामरे मॅनेजर, बिर्ला कार्बन इंडिया प्रा. ली, कुणाल काळभोर मॉन्टेरिया विलेज



रिसॉर्ट मॅनेजर, लक्ष्मण मोरे बिर्ला कार्बन इंडिया प्रा. ली., अरुण गोविंद जाधव अध्यक्ष पाताळगंगा नदी आणि पर्यावरण संवर्धन चॅरिटेबल ट्रस्ट, अभिजित पवार आदी उपस्थित होते.

# सचिन इंगळे यांना अव्वर सचिव पदावर पदोन्नती


**पनवेल : वार्ताहर**

सचिन इंगळे यांनी डी.एड पात्रता मिळवून प्रथम शिक्षक नंतर पोलीस खाते व त्यानंतर स्पर्धा परिक्षांमध्ये यशस्वी होवून महाराष्ट्र राज्य लोकसेवा आयोगाच्या परीक्षेत राज्यसेवेतून मंत्रालयात कक्ष अधिकारी (२०१६) या पदावर निवड झाली. त्यानंतर नुकतीच मंत्रालयात सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अव्वर सचिव पदावर पदोन्नती झाल्याने त्यांचे सर्वत्र कौतुक होत आहे.



सचिन रंगनाथ इंगळे यांनी नक्षलग्रस्त भागात साहेबांनी सामुदायिक विवाह सोहळा व अनेक शैक्षणिक उपक्रम राबवले. अडीच वर्षे पूर्ण झाल्यानंतर त्यांची बदली पनवेल, तालुका पोलीस ठाणे या ठिकाणी ग्रामीण पोलीस स्टेशनला झाली. हे सर्व करत असताना त्यांनी स्पर्धा परीक्षा अभ्यास चालूच होता. त्यातून त्यांची महाराष्ट्र राज्य लोकसेवा आयोगाच्या परीक्षेत राज्यसेवेतून मंत्रालयात कक्ष अधिकारी (२०१६) या पदावर निवड झाली. सार्वजनिक बांधकाम विभागात अत्यंत प्रामाणिकपणे व सचोटीने काम करून नुकतीच मंत्रालयात सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अव्वर सचिव पदावर पदोन्नती मिळाली. परीस्थितीची जाणिव व आपण समाजाचे काहीतरी देणे लागतो या भावनेतून आजही सर्व सामान्य लोकांसाठी साहेब नेहमीच मदत करतात. साधी राहणी व उच्च विचार असल्यामुळे त्यांच्यावर शुभेच्छांचा वर्षाव होत आहे.

# रेवदंड्यात गांजा जप्त; दाम्पत्याविरोधात गुन्हा



**रेवदंडा : प्रतिनिधी**

अलिबाग तालुक्यातील थेरोंडा फाटा येथे पोलिसांनी टाकलेल्या धाडीत दीड लाखांचा गांजा जप्त करण्यात आला आहे. या प्रकरणी रेवदंडा पोलीस ठाण्यात पती-पत्नीविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. रेवदंडा पोलीस आणि स्थानिक गुन्हे शाखेने संयुक्तरित्या ही कारवाई केली आहे.

अर्चना तळेकर आणि आशीष तळेकर अशी आरोपींची नावे आहेत. त्यांच्या थेरांडा फाटा येथील घरी गांजा विक्रीचा अवैध व्यवसाय सुरू असून तेथे गांजाचा साठा असल्याची माहिती पोलिसांना मिळाली होती. त्यावरून पोलीसांनी श्वान पथकासह तळेकर यांच्या घरी आणि स्वामी माऊली कॉटेज याठिकाणी सोमवारी सकाळी धाड टाकली. या वेळी आशीष तळेकर हा घरी नव्हता. पोलीसांनी त्या ठिकाणी झडती घेतली असता तीन वेगवेगळया पिशव्यांमध्ये साडेपाच किलो वजनाचा गांजा सापडला. या गांजाची अंदाजे किंमत दीड लाख रूपये इतकी आहे. पोलिसांनी गांजासह वजन काटा, स्टेपलर पिनांचे बॉक्स, प्लास्टीकच्या पिशव्यांचे बंडल असा ए लाख ५२ हजार रूपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. पोलीसांनी फॉरेन्सिक टीमलादेखील पाचारण केले आहे.

या गुन्ह्यातील आरोपी आशीष तळेकर याच्या विरोधात रेवदंडा पोलीस ठाण्यात यापूर्वी दोन गुन्हे दाखल आहेत. स्थानिक गुन्हे शाखेच्या हवालदार भाग्यश्री पाटील यांनी तक्रार दिली असून रेवदंडा पोलीस ठाण्याचे उपनिरीक्षक एस. आर. नंदगावे गुन्ह्याचा तपास करीत आहेत.

# झेनिथ वॉटरफॉलवर बंदी न घालण्याची मागणी

**खोपोली : प्रतिनिधी**

खोपोली शहराचे नावलौकिक जगभरात प्रसिद्ध असणाऱ्या या धबधब्यावर पावसाळी पर्यटनावर बंदी घालू नये ही विनंती खोपोली खालापूर संघर्ष समितीच्या माध्यमातून करण्यात आली आहे.

स्थानिकांच्या व्यवसायाचा विचार करून बंदी घालायचा निर्णय घेतल्यास आंदोलनाचा इशारा या वेळी देण्यात आला आहे.

खालापुर संघर्ष समिती हा विषय मार्गी लावेल असा विश्वास नागरिकांमध्ये तयार होत आहे. महाराष्ट्र शासन पर्यटन वाढण्यासाठी विशेष प्रयत्न करीत आहे. रायगड जिल्ह्यातील खोपोली येथील झेनिथ वॉटरफॉल (सुभेदार धबधबा) पाहण्यासाठी व निसर्गाच्या या देणगीचा आनंद घेण्यासाठी पर्यटक येत असतात. या पर्यटकामुळे स्थानिक व्यवसायाला चालना मोठ्या प्रमाणात मिळते, परंतू काही पर्यटक धोका पत्करून अथवा नियम बाह्य वागल्याने येथे दुर्घटना घडत असलेल्या कारणाने प्रशासन यावर बंदी आणते, परंतू याठिकाणी वाहतूक व्यवस्था सुरक्षा व्यवस्था प्रशासनाने कडक रित्या राबविल्यास बंदी न येता पर्यटक आनंद घेऊ शकतात. प्रशासनाने सुरक्षा नियम लावून स्थानिक प्रशासनाच्या माध्यमातून नियोजन केल्यास नक्कीच याचा लाभ सर्वांना होईल.

# मुरूडमध्ये एका दिवसात ३७१ मिमी पाऊस

**मुरूड : प्रतिनिधी**

रायगड जिल्ह्यामधून मुरूड तालुक्यात एका दिवसात ३७१ मिलिमीटर पावसाची नोंद झाली आहे. सतत पडणाऱ्या पावसामुळे मुरूड शहर व ग्रामीण भागातील जीवन विस्कळीत झाले आहे. मुरूड शहरातील दत्तवाडी परिसरात डोंगरावरून येणारे पाणी मुख्य रस्त्यात आल्याने जिथे तिथे पाणी साचले होते. त्याच प्रमाणे लक्ष्मीखार परिसरात मोठ्या प्रमाणात पाणी आल्याने लोकांना पाण्यातून प्रवास करावा लागत होता.

डोंगरी, राजपुरी, एकदरा परिसरात पाणीच पाणी साचल्याने मोठ्या प्रमाणात जनजीवन विस्कळीत झाले होते. मुरूड शहर मधील बाजार पेठ, गोल बंगला, दरबार रोड आदी परिसरात मोठ्या प्रमाणात पाणी साचले होते. मोठ्या प्रमाणात पाऊस पडल्याने दगड, झाडांच्या फांद्या, पालापाचोळा वाहून येऊन रस्त्यावर थांबल्याने जिथे तिथे कचराच कचरा पहावयास मिळत होता.



मुरूड तालुक्यात सध्या ढगफुटी सदृश्यस्थिती असुन पावसाने चांगलंच झोडपून काढले आहे. रस्त्यावर जिकडे तिकडे पाणीच पाणी साचल्याने नागरिक भिंतीच्या छायाखाली वावरत आहेत दत्तमंदिर जवळील डोंगराला भगदाड पडुन काही नागरिकांच्या घरात पाणी घुसले आहे. तसेच लक्ष्मीखार येथील अंतर्गत रस्तावर पाणी साचून घरात घुसण्याचा शक्यता निर्माण झाली आहे. यामुळे नागरिक भयभीत झाले आहे.

व्यापारी वर्गाला याचा मोठा फटका बसला आहे. मे महिन्यात रात्री उशिरापर्यंत बाजारपेठेत ग्राहकांची वर्दळ असायची, पण अवकाळी पावसाने बाजार पेठेत म्हणावी तशी ग्राहकांची वर्दळ दिसत नाही. परिणामी व्यापार मंदावला असे व्यापाऱ्यांचे म्हणणे आहे. केवळ शेतीवर गुजराण असणाऱ्या बळीराजाची चिंता या अवकाळी पावसाने वाढवली आहे. दरवर्षी मृग नक्षत्राची चाहूल लागताच सजग होणारा शेतकरी या वेळी निसर्गाच्या लहरीपणामुळे पुरता गोंधळून गेला आहे. ऐन पेरणीच्या दिवसांत शेताच्या बांधावरून पावसाचे पाणी वहात आहे.

गेल्या तीन दिवसांपासून सुरू असणाऱ्या अवकाळी पावसाने मुरूडमधील पर्यटन स्थळांना खीळ बसला आहे. जोरदार पर्जन्य वृष्टीमुळे काशीद व मुरूड येथील पर्यटक यांनी आपापले घर गाठून सुरक्षितेस महत्व दिले आहे. मे महिन्याचा पर्यटक यांचा बहर पुरता ओसरला असून समुद्रकिनारा सुना सुना झाला आहे. स्थानिकांचा रोजगार बुडाला असून पावसाच्या आगमनामुळे स्थानिक हॉटेल व लॉजिंग व्यावसायिकांचे मोठे आर्थिक नुकसान झाले आहे.

# मुरूडमधील २२ धोकादायक इमारतींच्या मालकांना नोटीस

**मुरूड : प्रतिनिधी**

मुरूड शहरातील धोकादायक इमारत किंवा मोडकळीस आलेल्या घरांचा भाग काढुन टाकावा यासाठी नगर परिषद हद्दीतील २२ घर मालकांना नोटीसद्वारे कळविण्यात आले असल्याची माहिती मुरूडचे नगर परिषदेच प्रशासक तथा मुख्याधिकारी सचिन बच्छाव यांनी दिली आहे.

या नोटिसींमध्ये रमांकात धोत्रे, भागिरथी साखरकर, परस्पर सहकारी पतपेढी कार्यालय, दीपक भायदे, अधिक्षक कस्टम ऑफिस, जानकी पाटील, मेनन बिल्डिंग, पांडुरंग दोडकुलकर, वीणा पिळणकर, हरिश्चंद्र सातांबेकर, मोहनलाल जैन, गजानन नागवेकर, काजी सत्तार कोटक, प्रमिला करडे, शुभांगी करडे, अनिस कादिरी, सिसिल भायदे, मुशरीफ खतीब, सुंदर गवाणकर, अरुण जमादार, गीता तोडणकर व कामरान शेख यांचा समावेश आहे. कामरान शेख वगळता सर्वांना नोटीसा बजावल्याचे सहाय्यक कर निरिक्षक नंदकुमार आंबेतकर यांनी सांगितले.

अवकाळी पाऊस, मान्सूनचा पाऊस व वादळ वाऱ्यामुळे जुन्या व धोकादायक स्थितीत असणाऱ्या इमारतीचा पडका, धोकादायक असलेला भाग, मजला अथवा संपुर्ण इमारत पाडून घरमालक व इमारत मालकांनी सहकार्य करावे. इमारतीचा किंवा घराचा भाग पाडतेवेळी परिसरातील रहिवाशांना रस्त्यावरून येणाऱ्या जाणाऱ्या नागरिकांना जीवितास क्षती हानी होऊ नये याची काळजी घ्यावी.

जर कोणाला दुखापत झाली तर नगर परिषद जबाबदार राहणारनाही. बावीस घरमालक, किंवा इमारत मालक जबाबदार राहतील. पावसाळ्याच्या आत धोकादायक इमारत किंवा मोडकळीस आलेला भाग काढुन सहकार्य करावे, असे आवाहन मुख्याधिकारी सचिन बच्छाव यांनी केले.

# वटवृक्ष पडल्याने वाहतूक ठप्प

## पाच तासानंतर रस्ता झाला मोकळा

**मुरूड : प्रतिनिधी**

मुरूड-मुंबई या मुख्य रस्त्यावरील विहूर येथील पेट्रोल पंप ओलांडल्यावर मुख्य रस्त्यावर महाकाय वडाचे झाड पहाटे पाच वाजता पडल्याने रस्त्याच्या दोन्ही बाजूकडील वाहतूक खूप जाम झाल्याने वाहतुकीचा खोळंबा निर्माण झाला होता.

मुरूड पोलिसांनी व मुरूड तहसीलदार यांनी सर्व विभागाला जागृत करून है महाकाय वडाचे झाड हटवण्यासाठी तीन जेसीबी व सात मशीन कटर मागवून अतिशय वेगाने हे झाड



रस्त्यावरून हटवण्यात मोठे यश मिळवले आहे. मुरूड पोलीस ठाण्याचे निरीक्षक नामदेव बंडगर यांच्या मार्गदर्शनाखाली

पोलीस स्टेशन कडील अधिकारी व स्टाप सह पोहचून व सदर बाबत इतर शासकीय यंत्रणा यांना कळविले व त्यांचे मदतीने चार जेसीबी व सहा कटर मशीनच्या साहाय्याने ११.१५ वाजेपर्यंत सदरचे झाड बाजूला केले व दोन्ही बाजूची वाहतूक सुरळीत सुरू करण्यात आली आहे.

वडाचे झाड खूप मोठे असल्याने व प्रशासनाने तात्काळ दखल घेऊन रस्ता मोकळा करून दिल्याने नागरिकांनी समाधान व्यक्त केलेले आहे. मुंबई कडे जाणारा हा महत्वाचा मार्ग असल्याने रस्त्याच्या दोन्ही बाजूस गाड्यांची मोठी गर्दी झाली होती. यामध्ये दुधाचा टेम्पो व मुंबई येथे जाणारे स्थानिक नागरिक पर्यटक यांना मोठा त्रास सहन करावा लागला.

# अश्विनी ठाकूर यांची नियुक्ती



**पाली : प्रतिनिधी**

पुरोगामी पत्रकार संघ (भारत संचालित) अन्याय अत्याचार निवारण समितीच्या रायगड जिल्हा अध्यक्षपदी अश्विनी नरेंद्र ठाकूर यांची नियुक्ती करण्यात आली. नियुक्ती झाल्याचे पत्र समितीचे संस्थापक अध्यक्ष विजय सूर्यवंशी, बाळासाहेब अडांगळे, अध्यक्ष दत्ता पाटील, कार्याध्यक्ष प्रमिला अडांगळे, उपाध्यक्ष दीपा अग्रवाल, राज्य सचिव प्रीतम सिंग चव्हाण यांच्या प्रमुख उपस्थितीत अश्विनी ठाकूर यांना सन्मानपूर्वक सुपूर्द करण्यात आले.

अश्विनी ठाकूर यांचा पेण सह रायगड जिल्ह्यात दांडगा जनसंपर्क असून सामाजिक व सेवाभावी कार्यात त्या नेहमीच अग्रेसर राहत आहेत. त्यांचे एकूणच समाजकार्य पाहता त्यांच्या खांद्यावर रायगड जिल्हा अध्यक्ष पदाची जबाबदारी सोपविण्यात आल्याचे पदाधिकाऱ्यांनी सांगितले.

# बकरी ईदच्या पार्श्वभूमीवर हिंदू संघटनांची पोलीस ठाण्यात बैठक



**चौक : प्रतिनिधी**


येणाऱ्या बकरी ईद सणाच्या पार्श्वभूमीवर खालापूर तालुक्यातील हिंदू संघटनांची बैठक खालापुर तालुका पोलीस हद्दीतील सर्व गोरक्षक, बजरंग दल, विश्व हिंदु परिषद व इतर हिंदु संघटनेच्या पदाधिकारी व कार्यकर्ते यांची बैठक वरिष्ठ पोलीस निरीक्षक सचिन पवार यांनी आयोजित करून येत्या ईद सणाच्या पार्श्वभूमीवर सूचना केल्या.

या बैठकीत बकरी ईद सणाच्या दरम्यान कोणतीही गोवंश हत्या होणार नाही याची काळजी घेतली जाईल, गो तस्करी संदर्भात काहीही माहिती मिळाल्यास त्याबाबत गोरक्षक यांनी स्वत: कोणतीच कारवाई न करता प्रथम पोलीस ठाण्यात माहिती दिली. गोहत्या संदर्भात सोशल मिडीया वर आक्षेपार्ह कोणतेही मेसेज टाकू नये ज्या मुळे समाजामध्ये जातीय तेढ निर्माण होईल असे कोणत्याही प्रकारचा संदेश, मजकूर, चित्रफिती, बॅनर, पोस्टर प्रसारीत होणार नाही याची दक्षता सर्व हिंदू संघटनांनी घ्यावी, अशा सुचना देण्यात आलेल्या आहेत. या वेळी हिंदू संघटनाचे प्रमुख पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

# मुसळधार पावसाने कर्जतमधील उल्हास नदी भरली

**कर्जत : प्रतिनिधी**

कर्जत तालुक्याला गेल्या दोन दिवसांपासून पावसाने अक्षरशः झोडपले आहे. विजांचा कडकडाट व ढगांचा गडगडाटासह दोन दिवस संततधार पडत असलेल्या पावसाने सर्वांचीच दैना उडवली. कर्जत शहराच्या शेजारून वाहणारी उल्हास नदी दुथडी भरून वाहू लागली. नदीचे पाणी केंव्हाही उलटून शहरात येईल. या भीतीने कर्जतकर रात्रभर जागेच राहिले. कोरडी ठाक असलेली उल्हास नदी आज पहाटे पासून कठोकाठ भरून वाहू लागली. ते ही मे महिन्यात. हेसुद्धा एक आश्चर्यच म्हणावे लागेल. नेरळ नजिकच्या दहिवली पुलावरून पाणी जात असल्याने मुरबाड, शहापूरकडे जाणारी वाहतूक ठप्प झाली आहे.



आठ मे पासून पावसाला सुरुवात झाली. तेंव्हा पासून दररोज पाऊस पडत आहे, मात्र गेल्या दोन दिवसांपासून पावसाचा जोर वाढला व दिवस रात्र पावसाने थैमान घातले. आज पहाटे विजांचा कडकडाट सुरु झाला व मुसळधार पावसाने सुरुवात केली. सकाळी शहरा शेजारून वाहणारी उल्हास नदी कठोकाठ भरली. नदी कधीही उलटून शहरात पाणी येईल. अशी भीती नदी काठी राहणाऱ्या नागरिकांना होती. त्यामुळे त्यांनी रात्र जागून काढली. नदी पत्रातील गाळ व झाडे झुडपे काढण्याचे काम सुरू असल्याने पोकलन आणि जेसीबी नदीतच होती. नदीचे पाणी वाढल्याने ती पोकलन व जेसीबी पाण्यात बुडाले. दुपार नंतर नदीचे पाणी कमी झाल्यानंतर पोकलन व जेसीबी नदी पात्रातून बाहेर काढण्यात आले.

या पावसाने विवाह सोहळ्यावर पाणी फेरले. अनेकांनी संध्याकाळी उघड्या मैदानात असलेले विवाह हॉल मध्ये घेतले. तर काहींनी संध्याकाळचे विवाह दुपारीच उरकून घेतले. शेतीच्या मशागतीची कामे खोळंबली, दुबार भातशेतीचे नुकसान झाले. वीट उत्पादकांचे खूप नुकसान झाले. गावा गावात होणारी घरांच्या डागडुजीच्या कामात व्यत्यय येऊन घरातील सामानाचे नुकसान झाले. मुलांना मे महिन्याच्या सुट्टीची मजा घेता येत नाही. त्यामुळे सर्वांचाच हिरमोड झाला, मात्र मे महिन्याच्या उकड्या पासून सुटका झाली. गुरांना पाणी मिळाले. तसेच पाणी टंचाई कमी झाल्याने पंचायत समितीला पाणी टंचाई भागात पाणी पुरवठा करण्यासाठी लागणारे टँकर सध्या तरी द्यावे लागणार नाहीत.

# वलगणीचे मासे पकडण्यासाठी धाव

**माणगाव : प्रतिनिधी**

यावर्षी मे महिन्याच्या शेवटी पावसाचे आगमन झाले असून गेली दोन दिवस माणगाव तालुक्यात सर्वत्र जोरदार अतीवृष्टी होत असल्याने माणगाव शहरातील काळ नदीने आपले पात्र ओलांडले असल्याने मासेमारी करणाऱ्या लोकांनी वलगणीचे मासे पकडण्याकडे जाळे घेऊन धाव घेतली आहे. वलगणीच्या माशांची, खेकडा, चिंबोऱ्यांची खवय्यांना दरवर्षी प्रतिक्षा असते.





पावसाळा आला की खेडेगावात वेध लागतात ते वलगणीच्या माशांचे, खेकडा आणि चिंबोरी सुरुवातीच्या पावसात नदी नाल्यातून येणारे मासे तसेच मिळणारे खेकडे खाण्यासाठी अतिशय चविष्ट व गाभोळीयुक्त असतात. पावसाच्या पाण्याच्या प्रवाहाबरोबर मासे शेताडीतून, ओहोळामधून अंडी सोडण्यासाठी मुख्य डोहापासून स्थलांतर करतात. माश्यांच्या या प्रवासास वलगन लागली असे म्हणतात. पावसात पाण्यात अंडी सोडून झाल्या नंतर मासे परतीच्या प्रवासास सुरुवात करतात. यास वलगन उतरणे असे म्हणतात. खास सुरुवातीच्या पावसात मिळणारे हे वलगनीचे मासे खाण्यास अतिशय चविष्ट असतात. पाग, कंडाळ घेऊन भर पावसात वळगणींचे मासे मारण्यासाठी दिवसरात्र एक करतात. या माशांमध्ये मळ्याचे मासे, शिवरे, शिंगट्या प्रसिद्ध आहेत. खोल पाण्यात मासेमारी करण्यापेक्षा अनेक मासेमार या दिवसातील वळगणींचे मासे पकडण्यास प्राधान्य देतात.

यावर्षी पाऊस लवकर आल्याने ओढे, नाले भरले आहेत. त्यामुळे वळगणीच्या माशांची, खेकड्याची चव लवकर चाखायला मिळत असल्याने खवय्ये आनंदित झाले आहेत. गेल्या वर्षी पाऊस उशिरा सुरू झाल्याने वळगणीचे मासे खवय्यांना उशिरा चाखायला मिळाले होते.

यावर्षी मात्र लवकर आलेल्या पावसामुळे वलगणीचे मासे खवय्यांना लवकरच चाखायला मिळणार आहेत. वळगणीचे गाभोळी युक्त मल्याचे मासे २०० रुपये, शिवड्याचे मासे ४०० रुपये किलो दराने विक्री होत असतात.

**सुरुवातीच्या पावसात मिळणारे मासे अतिशय चविष्ट असतात. अगदी छोट्या ओहोळामधून हे मासे पकडण्यास मिळतात. आम्ही पाग घेऊन दरवर्षी मासेमारी करतो. या वर्षी पाऊस लवकर आल्याने वळगणीचे मासे पकडण्यासाठी मिळणारा आनंद वेगळाच आहे.**

**-रशीद हाजीते,**
**वळगणप्रेमी, माणगाव**



**अलिबाग : सोमवारी पडलेल्या मुसळधार पावसामुळे अनेक घरांचे नुकसान झाले आहे.** (छाया : जितू शिगवण)

# मालुक-पन्हेळी रस्त्याचे खासदार सुनील तटकरेंच्या हस्ते उद्घाटन

**तळा : प्रतिनिधी**

तळा तालुक्यातील प्रधानमंत्री ग्राम सडक योजनेंतर्गत मालुक-पन्हेळी रस्त्याचे उद्घाटन सोमवारी (दि.२६) खासदार सुनील तटकरे यांच्या हस्ते झाले.

या वेळी अध्यक्ष नाना भौड उपनगराध्यक्ष चंद्रकांत रोडे, ॲड उत्तम जाधव, महिला अध्यक्षा जान्हवी शिंदे, माजी सभापती शेवंती अडखळे, नथुराम अडखले, नरेश पाजने, अनंत अडखले, किशोर शिंदे, प्रवीण आंबार्ले, मालुक पंचक्रोशी ग्रामस्थ व महिला मंडळ उपस्थित होते.

अनेक वर्षांपासून ह्या रस्त्याची मागणी ग्रामस्थ करत होते खासदार सुनील तटकरे यांचे प्रयत्नानी हा रस्ता झाला. या वेळी खासदार सुनील तटकरे यांनी हा रस्ता झाल्याने पन्हेली ते मालुक अंतर जवळ झाले तसेच म्हसळा तळा येण्यासाठी हा रस्ता पर्यायी झाला आहे. तळयाच्या विकासासाठी नेहमीच प्रयत्न करण्यात येणार असल्याचे सांगितले.



# पंजाब किंग्ज क्वालिफायर-१मध्ये; मुंबईवर मात

**जयपूर : वृत्तसंस्था**

पंजाब किंग्सने अखेरच्या साखळी सामन्यात मुंबई इंडियन्सला पराभवाचे पाणी पाजत महत्त्वपूर्ण विजय नोंदवला. पंजाबने सात विकेट्सने मुंबईचा पराभव करीत क्वालिफायर-१साठी आपली जागा निश्चित केली आहे.

पंजाब किंग्सचे फलंदाज प्रियांश आर्य आणि जोश इंग्लिस यांनी शतकी भागीदारी करीत सामना मुंबईपासून दूर नेला. प्रियांश आणि जोश इंग्लिस यांनी अर्धशतकी खेळी केल्या. याशिवाय पहिल्या डावात पंजाब किंग्सच्या गोलंदाजांनी उत्कृष्ट गोलंदाजी करीत मुंबईच्या धावांवर अंकुश ठेवला.



जयपूरमध्ये खेळल्या गेलेल्या दोन्ही संघांच्या लीग टप्प्यातील शेवटच्या सामन्यात पंजाबने अर्शदीप सिंगची उत्कृष्ट गोलंदाजी आणि प्रियांश आर्य-जोश इंग्लिसच्या जोरदार प्रतिआक्रमणाच्या जोरावर १९ षटकांत १८५ धावांचे लक्ष्य गाठले आणि गुणतालिकेत पहिले स्थान मिळवले आणि आता पहिला क्वालिफायर सामना संघ खेळणार आहे.

पंजाब किंग्सकडून १८६ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना प्रभसिमरन सिंग बाद झाला, तर प्रियांश आर्य आणि जोश इंग्लिस यांनी शतकी भागीदारी केली. प्रियांशने ३५ चेंडूत नऊ चौकार आणि दोन षटकारांसह ६२ धावा केल्या, तर इंग्लिस ४२ चेंडूत नऊ चौकार आणि तीन षटाकारांसह ७३ धावा करत बाद झाला. श्रेयस अय्यरने १६ चेंडूत २६ धावा केल्या आणि षटकारासह संघाला १८.३ षटकांत सात विकेट्सने विजय मिळवून दिला.

प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतल्यानंतर मुंबईची सुरुवात संथ झाली आणि सूर्यकुमार यादव वगळता टॉप-ऑर्डरमधील फलंदाज फारसे काही करू शकले नाहीत. अखेर सूर्यकुमारच्या अर्धशतकाच्या जोरावर त्यांनी १८४ धावांपर्यंत मजल मारली. सूर्याने २९ चेंडूत सहा चौकार आणि दोन षटकारांसह ५७ धावा केल्या. पंजाबकडून शेवटच्या षटकात अर्शदीपने फक्त तीन धावा देऊन दोन विकेट घेतल्या आणि मुंबईला २०० धावा करण्यापासून रोखले.

मुंबईची फलंदाजी आणि गोलंदाजी दोन्ही कोसळली. स्टार खेळाडूंनी भरलेल्या मुंबई संघात ना फलंदाज धावा काढू शकले आणि ना गोलंदाज पंजाबच्या फलंदाजांना रोखू शकले. प्रत्युत्तरात पंजाबने नऊ चेंडू शिल्लक असताना लक्ष्य गाठले.

# सूर्याचा नवा विश्वविक्रम; सचिनलाही टाकले मागे

**मुंबई : प्रतिनिधी**



मुंबई इंडियन्सचा स्टार फलंदाज सूर्यकुमार यादवने आयपीएलमध्ये धावांचा वर्षाव सुरूच ठेवला आहे. लीगच्या शेवटच्या सामन्यातही हीच कामगिरी कायम ठेवून सूर्याने विश्वविक्रम नोंदवला आहे. त्याने टी-२० क्रिकेटमध्ये सलग सर्वाधिक वेळा एका डावात २५ किंवा त्याहून अधिक धावा करण्याचा विक्रम नोंदवला आहे. एवढेच नाही तर त्याने सचिन तेंडुलकरलाही मागे टाकले आहे.

जयपूर येथे पंजाब किंग्जविरुद्धच्या सामन्यात सूर्यकुमारने शानदार अर्धशतक झळकावून संघाला मजबूत धावसंख्येपर्यंत नेण्यात महत्त्वाची भूमिका बजावली. सहाव्या षटकात पहिली विकेट पडल्यानंतर मुंबईचा उपकर्णधार सूर्या मैदानावर आला आणि त्याने येताच चौकार मारून धावा काढण्यास सुरुवात केली. यादरम्यान सूर्याने नवव्या षटकाच्या शेवटच्या चेंडूवर चौकार मारला, ज्यामुळे त्याची धावसंख्या २२ धावांवरून २६ धावांवर पोहोचली. सूर्याने या एका चौकाराने इतिहास रचला.

भारतीय टी-२० संघाचा कर्णधार सूर्यकुमार यादवने सलग १४व्या डावात २५ धावांचा टप्पा ओलांडला. यासह त्याने दक्षिण आफ्रिकेचा माजी टी-२० कर्णधार टेम्बा बावुमाला मागे टाकत एक नवा विश्वविक्रम रचला. एवढेच नाही तर आयपीएलच्या इतिहासात पहिल्यांदाच एका फलंदाजाने लीग टप्प्यातील प्रत्येक सामन्यात २५पेक्षा जास्त धावा करण्याचा पराक्रम केला.

एवढेच नाही तर सूर्याने या चौकारासह ६०५ धावांचा टप्पा गाठला आणि आयपीएलच्या इतिहासातील त्याच्या सर्वोच्च धावसंख्येशी बरोबरी केली. यापूर्वी सूर्याने आयपीएल २०२३मध्ये ६०५ धावा केल्या होत्या, जी त्याच्या कारकिर्दीतील सर्वोत्तम कामगिरी होती, पण या हंगामात सूर्याने त्यालाही मागे टाकले.

विशेष म्हणजे सूर्याने मुंबईचा माजी कर्णधार आणि महान फलंदाज सचिन तेंडुलकरचा विक्रमही मोडला. सचिनने २०१०च्या हंगामात ६१८ धावा केल्या होत्या, ज्या आयपीएलच्या गेल्या १७ हंगामात मुंबईच्या कोणत्याही फलंदाजाने केलेल्या सर्वाधिक धावा होत्या. सूर्याने हा विक्रम मागे टाकत ६५० धावांपर्यंत मजल मारली आहे.

## फ्रेंच खुल्या टेनिस स्पर्धेत श्वीऑटेक, अल्कराझ दुसऱ्या फेरीत

### राफेल नदालचा गौरव

**पॅरिस : वृत्तसंस्था**

इगा श्वीऑटेक आणि कार्लोस अल्कराझ यांनी फ्रेंच खुल्या टेनिस स्पर्धेच्या मोहिमेला विजयी सुरुवात करताना अनुक्रमे महिला व पुरुष एकेरीची दुसरी फेरी गाठली. पहिल्या दिवशी राफेल नदालचा गौरव करण्यात आला.

श्वीऑटेकने ४२व्या स्थानावरील रेबेका स्रामकोवाचा ६-३, ६-३ असा पराभव केला. रँडुकानूने तीन सेटच्या लढतीत चीनच्या वँग शिन्यूचा प्रतिकार ७-५, ४-६, ६-३ असा मोडून काढला. एलिना रायबाकिनाने ज्युलिया रिएराचे आव्हान ६-१, ४-६, ६-४ असे मोडून काढले. नवव्या मानांकित एमा नवारोला मात्र पहिल्या फेरीत जेसिका मॅनेइरोकडून ०-६, १-६ असा पराभव पत्करावा लागला.

पुरुष एकेरीत अल्कराझने पात्रता फेरीतून आलेल्या इटलीच्या गिउलिओ झेपिएरीवर ६-३, ६-४, ६-२ असा विजय मिळवला. चौथ्या मानांकित अमेरिकेच्या टेलर फ्रिट्झला डॅनिए अल्टमेअरकडून ५-७, ६-३, ३-६, १-६ असा पराभव पत्करावा लागला. विसाव्या मानांकित ग्रीसच्या स्टेफानोस त्सित्सिपासने टोमास मार्टिन एचेवेरीचे आव्हान ७-५, ६-३, ६-४ असे संपुष्टात आणले. सातव्या मानांकित कॅस्पर रुडने अल्बर्ट रामोस विनोलासवर ६-३, ६-४, ६-२ असा विजय मिळविला.

## आयपीएल फायनलमध्ये होणार ‘ऑपरेशन सिंदूर’च्या यशाचा जल्लोष

### बीसीसीआयची विशेष तयारी

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

आयपीएल २०२५ या १८व्या हंगामाचा शेवटचा सामना ३ जून रोजी गुजरातमधील नरेंद्र मोदी क्रिकेट स्टेडियमवर होणार आहे. या वेळी होणाऱ्या समारोप समारंभात ‘ऑपरेशन सिंदूर’च्या यशाचा जल्लोष केला जाणार आहे. त्यासाठी भारतीय क्रिकेट नियामक मंडळ (बीसीसीआय)ने खास तयारी केली असून तिन्ही सेनादलांच्या प्रमुखांना आमंत्रित केले आहे.

पहलगाममध्ये पर्यटकांवर झालेल्या दहशतवादी हल्ल्यात २६ निष्पाप लोकांचा बळी गेला. त्याला प्रत्युत्तर म्हणून भारताने ऑपरेशन सिंदूर राबवले. या कारवाईत पाकिस्तानला धडा शिकवला. ७ मे रोजी पाकिस्तान आणि पाकव्याप्त काश्मीरमधील दहशतवाद्यांचे अड्डे नष्ट करण्यात आले. दहशतवादविरोधात राबवलेल्या ऑपरेशन सिंदूरला अनेक देशांनी पाठिंबा दिला आहे. आता ऑपरेशन सिंदूरचा विजय आयपीएल २०२५च्या समारोप समारंभात साजरा केला जाणार आहे.

आयपीएलच्या अंतिम सामन्यात बीसीसीआयने खास पाहुण्यांना आमंत्रित केले आहे. ३ जून रोजी आयपीएलचा अंतिम सामना सुरू होण्यापूर्वी अहमदाबादमधील नरेंद्र मोदी स्टेडियममध्ये हा सोहळा होणार आहे. बीसीसीआयचे सचिव देवजित सैकिया यांनी सांगितले की, भारतीय क्रिकेट नियामक मंडळाने संरक्षण प्रमुख तसेच लष्कर, नौदल आणि हवाई दलाच्या प्रमुखांना आमंत्रित केले आहे. बीसीसीआय आपल्या सशस्त्र दलांच्या शौर्य, धैर्य आणि निःस्वार्थ सेवेला सलाम करतो. शूर वीरांना श्रद्धांजली म्हणून, आम्ही समारोप समारंभ सशस्त्र दलांना समर्पित करण्याचा निर्णय घेतला आहे.

## संपूर्ण संघ दोन धावांवर बाद

**लंडन : वृत्तसंस्था**

इंग्लंडमध्ये अलिकडेच झालेल्या एका सामन्यात वेगळाच प्रकार घडला. एक संघ फलंदाजीसाठी आला आणि अवघ्या दोन धावांवर बाद झाला.


इंग्लंडमधील हा विचित्र प्रकार मिडलसेक्स काउंटी क्रिकेट लीगमध्ये घडला. तिथे रिचमंड क्रिकेट क्लबचा फोर्थ इलेव्हन संघाचा सामना नॉर्थ लंडन क्रिकेट क्लब थर्ड इलेव्हनशी झाला. प्रथम फलंदाजी करताना नॉर्थ लंडनने ४५ षटकांत ४२६ धावा केल्या. प्रत्युत्तरात खेळताना रिचमंड संघ सामना हरेल अशी अपेक्षा होती, पण परिस्थिती इतकी वाईट होईल असे कोणीही विचार केला नव्हता.

रिचमंडचे फलंदाज मैदानात उतरले आणि काही वेळातच संपूर्ण संघ फक्त दोन धावा काढून पॅव्हेलियनमध्ये परतला. या दोनपैकी एक धाव वाईड बॉलची होती. म्हणजेच बॅटने फक्त एक धाव निघाली.
















दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **–मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अ‍ॅण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राइड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com